महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी
MAHATMA PHULE KRISHI VIDYAPEETH, RAHURI
अन्नं बहु कुर्वीत तद् व्रतम्
1969

# महात्मा फुले कृषि विद्यापीठ

## फेब्रुवारी २०२५

# ई वार्ता




**LEGEND**

| | | |
|---|---|---|
| ■ | Central Campus of MPKV | |
| ● | Agril. Research Station | 27 |
| ★ | Post Graduate Institute | 01 |
| ✿ | Agril. Technology Information Centre | 01 |
| ⚘ | Regional Extension Centre | 04 |
| ✹ | District Extension Centre | 05 |
| ❄ | Krishi Vigyan Kendra | 04 |
| ✖ | Agricultural Tech. School | 08 |
| ✪ | Agricultural Engg. College | 02 |
| ✡ | Agricultural College | 08 |
| 8 | Horticulture College | 02 |
| © | ABM College -1 | 01 |
| @ | Food Technology College - 1 | 01 |
| # | Agriculture Polytechnic College - 1 | 01 |

मफुकृवि विस्तार प्रकाशन क्र.२७८१/२०२५

मफुकृवि ई वार्ता
फेब्रुवारी २०२५

वर्ष :९, अंक क्रं. : ९०, फेब्रुवारी, २०२५ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

## महात्मा फुले कृषि विद्यापीठातील सेंटर ऑफ एक्सलन्स प्रकल्पाला महासंचालक श्री. रावसाहेब भागडे यांची भेट







**दि. १० फेब्रुवारी, २०२५.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथील काटेकोर शेतीसाठी डिजिटल तंत्रज्ञानावर आधारित सेंटर ऑफ एक्सलन्स प्रकल्पाला कृषि परिषदेचे महासंचालक श्री. रावसाहेब भागडे यांनी भेट दिली. यावेळी महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरु डॉ. साताप्पा खरबडे, कृषि परिषदेचे संशोधन संचालक डॉ. किशोर शिंदे, माजी संशोधन संचालक डॉ. सुनील गोरंटीवार, कुलसचिव डॉ. नितीन दानवले व कृषि अभियांत्रिकी विभागाचे प्रमुख तथा काटेकोर शेतीसाठी डिजिटल तंत्रज्ञानावर आधारित सेंटर ऑफ एक्सलन्स प्रमुख संशोधक डॉ. सुनील कदम उपस्थित होते.

याप्रसंगी श्री. रावसाहेब भागडे मार्गदर्शन करतांना म्हणाले की शेतीमध्ये प्रभावी सिंचन व्यवस्थापन करण्यासाठी, विविध पिकांचे प्रत्यक्ष वेळेनुसार अचूक सिंचन वेळापत्रक ठरवण्यासाठी, पाणी वापर कार्यक्षमता सुधारणे व उत्पादनात वाढ होण्याची क्षमता आय.ओ.टी. तंत्रज्ञानामध्ये आहे. महात्मा फुले कृषि विद्यापीठातील सेंटर ऑफ एक्सलन्स या प्रकल्पात होत असलेले संशोधन शेतकऱ्यांना फायदेशीर आहे. या भेटीप्रसंगी आयओटी सक्षम मृद ओलावा संवेदक आणि फुले मृदा ओलावा संवेदक आधारित सिंचन वेळापत्रक प्रणाली, फुले स्मार्ट हवामान केंद्र, हायपरस्पेक्टरल इमेजिंगचा शेतीसाठी ड्रोन व दूरस्थपणे चालणारा फवारणी फुले रोबोट, या तंत्रज्ञानाबद्दलची माहिती डॉ. सुनील कदम यांनी दिली. या भेटीनंतर श्री. रावसाहेब भागडे यांनी कृषि किटकशास्त्र विभागातील किडनाशक अंश पृथःकरण प्रयोगशाळेला व मधुमक्षिका पालनालाही भेट देवून माहिती घेतली. या भेटीच्या वेळी डॉ. योगेश सैंदाने व डॉ. सुदर्शन लटके यांनी माहिती दिली. काटेकर शेतीसाठी डिजिटल तंत्रज्ञानावर आधारित सेंटर ऑफ एक्सलन्स प्रकल्पातील इंजि. किरण पवार, इंजि. निलकंठ मोरे, संशोधन सहयोगी डॉ. शुभांगी घाडगे, डॉ. वैभव मालुंजकर, डॉ. गिरीशकुमार भणगे, इंजि. तेजश्री नवले, डॉ. आनंद बडे व इंजि. अभिषेक दातीर उपस्थित होते.

## महात्मा फुले कृषि विद्यापीठामध्ये छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्साहात साजरी

**दि. १९ फेब्रुवारी, २०२५.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथील राष्ट्रीय सेवा योजना संचालनालय, पदव्युत्तर महाविद्यालय,

मफुकृवि ई वार्ता
फेब्रुवारी २०२५

वर्ष :९, अंक क्रं. : ५०, फेब्रुवारी, २०२५ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी




डॉ. अण्णासाहेब शिंदे कृषि अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने शिवजयंती उत्सवाचे आयोजन डॉ. नानासाहेब पवार सभागृहात करण्यात आले होते. याप्रसंगी अध्यक्षस्थानी महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. साताप्पा खरबडे उपस्थित होते. याप्रसंगी प्रमुख व्याख्याते म्हणून देवळाली प्रवरा नगर परिषदेचे मुख्याधिकारी श्री. विकास नवाळे उपस्थित होते. याप्रसंगी व्यासपीठावर विस्तार शिक्षण संचालक डॉ. गोरक्ष ससाणे, कुलसचिव डॉ. नितीन दानवले, राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक तथा विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. महावीरसिंग चौहान, कृषि प्रक्रिया अभियांत्रिकी विभाग प्रमुख डॉ. कैलास कांबळे, कृषि अर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ. राजेंद्र हिले, कुलगुरूंचे तांत्रिक अधिकारी डॉ. पवन कुलवाल व विद्यापीठ क्रीडा अधिकारी डॉ. विलास आवारी उपस्थित होते.

यावेळी प्रभारी कुलगुरू डॉ. साताप्पा खरबडे मार्गदर्शन करतांना म्हणाले की लोकांच्या मनावर राज्य करणारा राजा म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज होय. अठरापगड जातीच्या लोकांना एकत्र घेऊन स्वराज्याची स्थापना करण्याचे महत्त्वाचे कार्य छत्रपती शिवाजी महाराजांनी केले. शिवाजी राजे म्हणजे प्रजावत्सल, लोक कल्याणकारी, बहुजन प्रतिपालक, सर्वधर्मसमभाव जपणारे, सर्वांना समतेची वागणूक देणारे असे राजे होते. छत्रपतींचे आचार व विचार आपण आपल्या आचरणात आणावे. छत्रपतींचे कार्य हे इतके अफाट होते की शिवचरित्र अजूनही तरुणांचे ऊर्जास्रोत आहे.

यावेळी प्रमुख मार्गदर्शन करताना श्री. विकास नवाळे म्हणाले की छत्रपती शिवाजी महाराज हे शुन्यातून स्वराज्य निर्माण करणारे पहिले राजे होते. शिवचरित्र आपल्याला निष्ठा, धैर्य, पराक्रम, प्रामाणिकपणा, कष्ट, नियोजन शिकविते. शिवाजी राजांनी चारशे वर्षांपूर्वी बरेच उपक्रम सुरू केले. यामध्ये समाजकारण, राजकारण, कृषिकारण इ. चा समावेश होतो. त्यांनी जमिनीची मोजणी, जमिनीच्या मातीनुसार प्रतवारी इत्यादी उपक्रम सुरू केले. स्वच्छता अभियानाचे प्रवर्तक शिवाजी महाराज होते. शिवाजी महाराजांनी जीवाला जीव देणारी माणसे गोळा करून स्वराज्य स्थापनेचे महत्त्वाचे कार्य केले. स्त्रियांचा सन्मान, व्यसनमुक्त जीवन, आई-वडिलांचा आदर व त्यांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी कार्य करणे म्हणजेच शिवचरित्र अंगीकारणे होय असे यावेळी ते म्हणाले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक, स्वागत व प्रमुख पाहुण्याची ओळख डॉ. महावीरसिंग चव्हाण यांनी केले. याप्रसंगी राहुरी नगरपालिकेचे मुख्याधिकारी श्री. ज्ञानेश्वर ठोंबरे, पोलीस निरीक्षक श्री. संजय ठेंगे, विद्यापीठाचे उपकुलसचिव श्री. विजय पाटील उपस्थित होते. यावेळी राहुरी येथून महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी आणलेल्या शिवज्योतीचे पूजन तसेच छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे पूजन व महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांनी केले. कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराजांची आरती, विद्यापीठ गीत व महाराष्ट्र गीताने करण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पदव्युत्तर महाविद्यालयाच्या विद्यार्थिनी कु. श्रद्धा सनस व कु. स्नेहल माळी यांनी तर आभार डॉ. विलास आवारी यांनी मानले. या कार्यक्रमासाठी विद्यापीठातील शास्त्रज्ञ, प्राध्यापक, कर्मचारी व पदव्युत्तर महाविद्यालयाचे तसेच कृषि अभियांत्रिकी महाविद्यालयाचे विद्यार्थी, विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## महात्मा फुले कृषि विद्यापीठात उद्यानविद्या विभागातर्फे २१ दिवसांचे प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन

**दि. ५ फेब्रुवारी, २०२५.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथे उद्यानविद्या विभागांतर्गत असलेल्या उद्यानविद्या (फळपिके) विभागातील प्राध्यापकांसाठी अद्ययावत प्रशिक्षण केंद्रामार्फत हवामान बदल : कमी वापरात असलेल्या दुर्लक्षित फळपिकांच्या उत्पादन तंत्रज्ञानामध्ये अलिकडच्या काळातील प्रगती या विषयावरील २१ दिवसांच्या प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी प्रमुख पाहुण्या म्हणुन नवी दिल्ली येथील भारतीय कृषि अनुसंधान संस्थेच्या शिक्षण नियोजन व गृह विज्ञान विभागाच्या सहाय्यक महासंचालक डॉ. बिमलेश मान उपस्थित होत्या. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे संशोधन संचालक






डॉ. विठ्ठल शिर्के होते. याप्रसंगी विस्तार शिक्षण संचालक डॉ. गोरक्ष ससाणे, उद्यानविद्या विभाग प्रमुख तथा प्रशिक्षण कार्यक्रमाचे संचालक डॉ. बी. टी. पाटी, कृषि अभियांत्रिकी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. रविंद्र बनसोड, सहयोगी संशोधन संचालक डॉ. विष्णू गरांडे, अन्नशास्त्र व तंत्रज्ञान विभाग प्रमुख डॉ. विक्रम कड व नोडल अधिकारी डॉ. एम. आर. पाटील उपस्थित होते.

यावेळी डॉ. बिमलेश मान आपल्या मार्गदर्शनात म्हणाल्या की भारतीय शेती ही देशाच्या अर्थ व्यवस्थेचा कणा असून देशातील ५० टक्के लोकसंख्या प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे शेतीवर अवलंबून आहे. कृषि क्षेत्राच्या जीडीपीमध्ये उद्यानविद्या पिकांचा ३० टक्के वाटा आहे. उद्यानविद्या पिकांमध्ये मोठी क्षमता असून त्यांची उत्पादकता वाढविण्यासाठी शाश्वत तंत्रज्ञानावर काम करणे गरजेचे आहे. आपण अन्नधान्यामध्ये स्वयंपूर्ण असलो तरी विकसीत भारत २०४७ साठी उत्पादन दुप्पट होणे गरजेचे आहे. यासाठी आधुनिक, शाश्वत आणि पर्यावरणपुरक तंत्रज्ञानाची आवश्यकता आहे. विकसीत भारत २०४७ चे ध्येय गाठायचे असेल तर भाजीपाल्यासाठी उत्तम प्रतिचे बियाणे, फळे साठविण्यासाठी तालुका पातळीवर शितगृहे, अद्ययावत गोडावून, तालुका पातळीवर कस्टम हायरींग सेंटर यासारख्या पायाभुत सुविधा तसेच उद्यानविद्या पिकांमध्ये कृत्रिम बुध्दीमत्तेचा वापर आणि फळप्रक्रिया केंद्रे उभे राहण्याची आवश्यकता आहे. याप्रसंगी डॉ. विठ्ठल शिर्के आपल्या अध्यक्षीय मार्गदर्शनात म्हणाले की देशातील वाढत्या लोकसंख्येची फळांची गरज भागविण्यासाठी तसेच फळांपासून काढणी पश्चात तंत्रज्ञानातून उपपदार्थ निर्मिती केली तर फळपिके उत्पादक शेतकऱ्यांना आर्थिक फायदा होईल. त्यासाठी फळांपासून उपपदार्थांची निर्मिती करतांना फळांची मुळ गुणवत्ता व पौष्टीक मुल्यांची जपणुक करणे महत्वाचे आहे. दुर्लक्षीत फळपिकांमध्ये अधिक पौष्टीक गुणधर्म असल्यामुळे त्यांच्यावर अधिक संशोधन करणे गरजेचे आहे.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला डॉ. बी. टी. पाटील यांनी या प्रशिक्षणाची रुपरेषा तसेच आत्तापर्यंत घेतलेल्या प्रशिक्षणांचा आढावा सादर केला. या २१ दिवसीय प्रशिक्षणामध्ये ५३ विविध विषयांवर व्याख्याने तसेच पाच अभ्यास दौरे आयोजीत करण्यात आले. या प्रशिक्षणासाठी महाराष्ट्रासह सहा राज्यातील २५ प्रशिक्षणार्थी सहभागी झाले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रशिक्षण कार्यक्रमाचे समन्वयक डॉ. ज्ञानेश्वर क्षिरसागर यांनी तर आभार प्रशिक्षण कार्यक्रमाचे सहसमन्वयक डॉ. जितेंद्र ढेमरे यांनी मानले. यावेळी उद्यानविद्या विभागातील शास्त्रज्ञ, प्राध्यापक व कर्मचारी उपस्थित होते.

## महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथे राज्यस्तरीय सहयोगी अधिष्ठाता समन्वय समितीची बैठक संपन्न

**दि. १३ फेब्रुवारी, २०२५.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथे राज्यस्तरीय सहयोगी अधिष्ठाता (कृषि तंत्रज्ञान शिक्षण) समन्वय समितीची दोन दिवसीय बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी या बैठकीच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र राज्यातील चारही कृषि विद्यापीठांचे कृषि तंत्रज्ञान शिक्षण विभागाचे सहयोगी अधिष्ठाता राज्यस्तरीय समितीचे अध्यक्ष डॉ. प्रशांत बोडके होते. यावेळी या कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी प्रमुख उपस्थितीमध्ये महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. नितीन दानवले होते. याप्रसंगी कृषि अभियांत्रिकी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. रविंद्र बनसोड, परभणी येथील वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. जी. के. लोंढे, दापोली येथील डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. आर. टी. ठोकळ, अकोला येथील डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. आर. एन. काटकर व बारामती येथील कृषि तंत्र निकेतनचे प्राचार्य डॉ. रासकर उपस्थित होते.




यावेळी डॉ. प्रशांत बोडके म्हणाले की महाराष्ट्र राज्यातील कृषि पदविका अभ्यासक्रम उत्तीर्ण विद्यार्थ्यांना कृषि शिक्षणाच्या कौशल्य विकास कार्यक्रमांतर्गत नविन शैक्षणिक धोरणाशी सन २०२० नुसार सुसंगत करुन उच्च शिक्षणाच्या अनेक संधी उपलब्ध होणार आहेत. त्यामुळे या विद्यार्थ्यांना स्वयं रोजगारातून अनेक लघुउद्योग उभारता येतील. यावेळी डॉ. नितीन दानवले आपल्या मार्गदर्शनात म्हणाले की कृषि पदविकेच्या शिक्षणाला कौशल्य आधारीत शेतीपूरक व्यवसायिक अभ्यासक्रमाची जोड द्यायला हवी. यामुळे या विद्यार्थ्यांना नोकरी तसेच स्वतःचा उद्योग निर्माण करण्याच्या अनेक संधी निर्माण होतील. डॉ. रविंद्र बनसोड आपल्या मार्गदर्शनात म्हणाले की कृषि पदविकेच्या अभ्यासक्रमामध्ये कृत्रिम बुध्दीमत्ता, रोबोट तंत्रज्ञान तसेच ड्रोन तंत्रज्ञान या विषयीचा आंतर्भाव होणे गरजेचे असून यामुळे या विद्यार्थ्यांना विविध राष्ट्रीय स्तरावरील कंपन्यांमध्ये नोकरीच्या संधी निर्माण होतील.

महाराष्ट्र राज्यातील चारही कृषि विद्यापीठात सुरु असलेले माळी प्रशिक्षण, कृषि तंत्र पदवीका व कृषि तंत्र निकेतन अभ्यासक्रमाच्या अनुषंगाने भारत सरकारच्या नविन शैक्षणिक धोरणानुसार इयत्ता १० वी उत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी उच्च शिक्षणाच्या व स्वयं रोजगाराच्या नवनवीन कौशल्य विकास अभ्यासक्रमासह नाविन्यपूर्ण संधी उपलब्ध होण्यासाठी सदरच्या तीनही अभ्यासक्रमात बदल करण्यासाठी दोन दिवसीय बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. हेमचंद्र परदेशी यांनी तर आभार पुणतांबा कृषि तंत्र विद्यालयाचे प्राचार्य डॉ. पंडित खर्डे यांनी मानले. या कार्यक्रमासाठी विद्यापीठातील विभाग प्रमुख, चारही विद्यापीठांचे तांत्रिक अधिकारी उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अशोक हारदे, सौ. छाया पालवे, दत्तात्रय राजे यांनी परिश्रम घेतले.

## महात्मा फुले कृषि विद्यापीठात कृषि अर्थशास्त्र विभागाच्या रौप्य महोत्सवी राष्ट्रीय परिसंवादाचे आयोजन







**दि. २७ फेब्रुवारी, २०२५.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथील कृषि अर्थशास्त्र विभाग व अकोला येथील महाराष्ट्र सोसायटी ऑफ ॲग्रीकल्चर इकॉनॉमिक्स यांचे संयुक्त विद्यमाने २५ व्या दोन दिवसीय राष्ट्रीय परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते. या परिसंवादाचा

विषय ग्रामीण समृद्धीसाठी नाविन्यपूर्ण संशोधन व उद्योजकता : कृषि दृष्टिकोन हा होते. या परिसंवादाच्या उद्घाटन कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. साताप्पा खरबडे उपस्थित होते. यावेळी या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून नवी दिल्ली येथील भारत सरकारच्या कृषि मूल्य व किंमत आयोगाचे अध्यक्ष डॉ. विजय पॉल शर्मा उपस्थित होते. याप्रसंगी प्रमुख उपस्थितीमध्ये राज्याच्या कृषि मूल्य आयोगाचे अध्यक्ष श्री. पाशा पटेल हे होते. यावेळी विस्तार शिक्षण संचालक डॉ. गोरक्ष ससाणे, संशोधन संचालक डॉ. विठ्ठल शिर्के, कुलसचिव डॉ. नितीन दानवले, कृषि अर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ. राजेंद्र हिले, महाराष्ट्र सोसायटी ऑफ अॅग्रीकल्चर इकॉनॉमिक्स संस्थेचे अध्यक्ष डॉ. डी. एल. साळे, संस्थेचे सेक्रेटरी डॉ. आर. जी. देशमुख, अकोला येथील सोसायटीचे कोषाध्यक्ष डॉ. एस. सी. नागपूरे, विविध कृषि विद्यापीठातील अर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ. कदम, डॉ. माने, डॉ. मोरे, डॉ. तोरणे, कृषिभुषण श्री. सुरसिंग पवार व आयोजन समितीचे सचिव डॉ. रोहित निरगुडे उपस्थित होते.

यावेळी प्रभारी कुलगुरू डॉ. साताप्पा खरबडे म्हणाले की महात्मा फुले कृषि विद्यापीठामध्ये आयोजीत करण्यात आलेल्या या परिसंवादाचे उद्दिष्ट्ये, संशोधन आणि क्षेत्रस्तरीय अंमलबजावणीमधील अंतर भरुन काढण्याचे मार्ग शोधणे, मुल्यवर्धनास तसेच कृषि उद्योजकांना प्रोत्साहन देणे आणि हवामान स्मार्ट कृषि पध्दती विकसीत करणे हा आहे. येथे होणाऱ्या चर्चेचा फायदा शेतकऱ्यांनाच नव्हे तर कृषि क्षेत्रासाठी चांगली धोरणे तयार करणाऱ्यांनाही होईल.

यावेळी डॉ. विजय पॉल शर्मा मार्गदर्शन करताना म्हणाले की शेतकऱ्यांना उच्च प्रतीचे बियाणे वेळेवर व कमी किमतीत उपलब्ध होणे गरजेचे आहे. त्याचबरोबर त्याने पिकविलेल्या मालाला योग्य बाजारपेठ मिळण्यासाठी व चांगला भाव मिळण्यासाठी ग्रामीण भागामध्ये शीतगृहांची उपलब्धता, रस्त्यांचे जाळे आणि ग्रेडिंग व प्रोसेसिंग युनिटची उपलब्धता असणे नितांत आवश्यक आहे. ज्या पिकांमुळे शेतकऱ्याला जास्त दर मिळेल अशी पिके घेण्यासाठी शेतकऱ्यांना प्रवृत्त करावे लागणार आहे. भारताने कडधान्यांच्या उत्पादनात मोठी वाढ घडवून आणली आहे. या दोन दिवसीय परिषदेमध्ये शास्त्रज्ञांनी शेतकरीभिमुख शिफारशी देणे आवश्यक असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. श्री. पाशा पटेल आपल्या मार्गदर्शनात म्हणाले की भारतीय शेती क्षेत्रात होऊ घातलेल्या हवामान बदलास तोंड देण्यासाठी योग्य तंत्रज्ञानाचा अविष्कार करणे गरजेचे आहे. तसेच कृषि शास्त्रज्ञांनी याविषयी अधिकाधिक संशोधन करणे व ते शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले. डॉ. डी. एल. साळे आपल्या मार्गदर्शनात म्हणाले की या परिसंवादामध्ये भविष्यातील शेती मजबुत करण्याच्या दृष्टीने तसेच शेतकऱ्यांच्या शाश्वततेसाठी सहभागी संशोधकांनी प्रयत्न करावेत. आयोजन समितीचे अध्यक्ष डॉ. राजेंद्र हिले यांनी सांगितले की भारतीय शेतीला अनेक आव्हानांचा सामना करावा लागत आहे. संसाधन, व्यवस्थापन, मुल्यसाखळी विकास आणि ग्रामीण समृध्दीसाठी पुराव्यावर आधारीत धोरण तयार करण्यास मदत करण्यासाठी या परिसंवादातून निघणाऱ्या शिफारशी संकलीत करुन महाराष्ट्र शासनाला सादर केल्या जातील. याप्रसंगी कृषि अर्थशास्त्र विभागाचे माजी विभाग प्रमुख डॉ. ज्ञानदेव कासार व अकोला कृषि विद्यापीठाचे माजी अधिष्ठाता डॉ. डी.एल. साळे यांना जीवन गौरव पुरस्कार देवून सन्मानीत करण्यात आले. यावेळी कृषि अर्थशास्त्र विभागाने तयार केलेली स्मरणीका व थेसीस कॉम्पीडीयम या पुस्तकांचे विमोचन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. रोहित निरगुडे व विद्यार्थीनी श्रावणी हिने तर आभार उप संशोधन सचांलक डॉ. पी.एन. शेंडगे यांनी मानले. या दोन दिवसीय परिसंवादासाठी देशभरातील कृषि विद्यापीठे आणि इतर प्रमुख संस्थांमधून सुमारे ६०० पेक्षा जास्त शास्त्रज्ञ आणि विद्यार्थी सहभागी झाले आहेत.

## महात्मा फुले कृषि विद्यापीठात उद्यानविद्या विभागातर्फे २१ दिवसांचा प्रशिक्षण कार्यक्रम संपन्न

**दि. २५ फेब्रुवारी, २०२५.** महात्मा फुले कृषि विद्यापीठातील उद्यानविद्या विभागांतर्गत असलेल्या उद्यानविद्या (फळपिके) विभागातील प्राध्यापकांसाठी अद्ययावत प्रशिक्षण केंद्रामार्फत हवामान बदल : कमी वापरात असलेल्या दुर्लक्षित फळपिकांच्या उत्पादन तंत्रज्ञानामध्ये अलिकडच्या काळातील प्रगती या विषयावरील २१ दिवसांच्या प्रशिक्षण कार्यक्रम आयोजीत करण्यात आला होता. या कार्यक्रमाच्या समारोपप्रसंगी प्रमुख पाहुण्या म्हणुन नवी दिल्ली येथील भारतीय कृषि अनुसंधान परिषदेच्या मनुष्यबळ विकास विभागाच्या सहाय्यक महासंचालक डॉ. सिमा जग्गी उपस्थित होत्या. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे संशोधन संचालक डॉ. विठ्ठल शिर्के होते. याप्रसंगी कृषि तंत्रज्ञानचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. प्रशांत बोडके, उद्यानविद्या विभाग प्रमुख तथा प्रशिक्षण कार्यक्रमाचे संचालक डॉ. बी. टी. पाटील व नोडल अधिकारी डॉ. एम. आर. पाटील उपस्थित होते.

यावेळी मार्गदर्शन करतांना डॉ. सिमा जग्गी म्हणाल्या की भारतीय कृषि अनुसंधान परिषद पदव्युत्तर व आचार्य पदवीकरीता विद्यार्थ्यांना रु. १०० कोटीपेक्षा जास्त शिक्षवृत्ती देते तसेच दरवर्षी ३० विद्यार्थ्यांना परदेशात जावून पदव्युत्तर आचार्य पदवीसाठीसुध्दा शिष्यवृत्ती देते. कृषि अनुसंधान परिषदेने २०२४-२५ पासून राष्ट्रीय शिक्षण धोरणांतर्गत पदवीसाठी नवीन अभ्यासक्रम लागु केला आहे.






याप्रसंगी डॉ. विठ्ठल शिर्के आपल्या अध्यक्षीय मार्गदर्शनात म्हणाले की देशाचे फळपिकाखाली असलेले क्षेत्र दिवसेंदिवस मोठ्या प्रमाणावर वाढत आहे. याचबरोबर दुर्लक्षीत फळपिकांमध्ये असलेल्या पौष्टीक मुल्यांमुळे या फळपिकांवर देखाल अधिकचे संशोधन होणे गरजेचे आहे. त्यामुळे सदरच्या प्रशिक्षणाचा विषय अत्यंत महत्वाचा व उपयुक्त आहे. या प्रशिक्षणामध्ये सहभागी झालेल्या प्रशिक्षणार्थींनी या प्रशिक्षणाचा उपयोग आपआपल्या राज्यातील दुर्लक्षीत असलेल्या विविध वनस्पती शोधून त्यावर संशोधनासाठी करावा.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला डॉ. बी. टी. पाटील यांनी या २१ दिवसीय प्रशिक्षणामध्ये घेतलेल्या एकुण ५२ विविध व्याख्याने, सात प्रात्यक्षिके व चार दिवसांच्या विविध प्रक्षेत्रावरील भेटीसंबंधी माहिती दिली. या प्रशिक्षणाच्या कार्यकाळात प्रशिक्षणार्थींनी बारामती, राजगुरुनगर व पुणे येथील केंद्रीय संशोधन संस्था तसेच कृषि विज्ञान केंद्र, बारामती व नाशिक येथील सह्याद्री शेतकरी उत्पादक कंपनी या ठिकाणी भेटी दिल्या. या प्रशिक्षणामध्ये महाराष्ट्रासह सहा राज्यातील १७ प्रशिक्षणार्थी सहभागी झाले होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रशिक्षणाचे सहसमन्वयक डॉ. ज्ञानेश्वर क्षिरसागर यांनी तर आभार प्रशिक्षणाचे सहसमन्वयक डॉ. जितेंद्र ढेमरे यांनी मानले. यावेळी उद्यानविद्या विभागातील शास्त्रज्ञ, प्राध्यापक व कर्मचारी उपस्थित होते.

## महात्मा फुले कृषि विद्यापीठात शास्त्रज्ञांशी संवाद कार्यक्रम संपन्न





**दि. ६ फेब्रुवारी, २०२५.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथे शास्त्रज्ञांबरोबर संवाद कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे संशोधन संचालक डॉ. विठ्ठल शिर्के होते. या सत्रासाठी तज्ञ म्हणुन नवी दिल्ली येथील भारतीय कृषि अनुसंधान परिषदेच्या शिक्षण नियोजन व गृह विज्ञान विभागाच्या सहाय्यक महासंचालिका डॉ. बिमलेश मान उपस्थित होत्या. याप्रसंगी विस्तार शिक्षण संचालक डॉ. गोरक्ष ससाणे, कृषि अभियांत्रिकी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. रविंद्र बनसोड, हाळगाव कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. अनिल काळे, उद्यानविद्या विभाग प्रमुख डॉ. बी. टी. पाटील व नोडल अधिकारी डॉ. एम. आर. पाटील उपस्थित होते.

यावेळी डॉ. विठ्ठल शिर्के आपल्या मार्गदर्शनात म्हणाले की विद्यापीठाने कमी मनुष्यबळामध्ये आत्तापर्यंत संशोधन, शिक्षण व विस्तार कार्यामध्ये भरीव असे योगदान दिले असून यामुळे विद्यापीठाला 'अ' उत्कृष्ठ मानांकन मिळाले आहे. राहुरी कृषि विद्यापीठाने विकसीत केलेल्या प्रमुख आठ पिकांच्या वाणांचे आर्थिक विश्लेषण केले असता असे निदर्शनास आले आहे की या आठ पिकांच्या वाणांमुळे आजपर्यंत राज्याच्या अर्थव्यवस्थेमध्ये ढोबळमानाने एकूण रु. २,४०,१८८ कोटी व निव्वळ रु. ३२,२०६ कोटी इतक्या महसुली उत्पन्नाची भर पडली आहे. यावेळी डॉ. बिमलेश मान मार्गदर्शन करतांना म्हणाल्या की विकसीत भारत २०४७ करीता देशाला जास्तीत जास्त कृषि पदवीधर व कृषि व्यवसायकांची गरज आहे. भारतीय शेती शाश्वत तसेच पर्यावरणपूरक होण्यासाठी नैसर्गिक शेतीची आवश्यकता आहे. यावेळी त्यांनी विविध कौशल्य आधारीत कोर्स, एन.आर.एफ. मानांकन सुधारण्यासाठी करावयाच्या विविध बाबी तसेच नाहेपद्वारे सुरु केलेल्या डिजीटल लर्नींग, नविन होकेशनल कोर्सस, पदवीका कोर्सेस व द्विपदवी कार्यक्रमाबाबतची विस्तृत माहिती दिली. याप्रसंगी उपस्थित विभाग प्रमुख, कृषि महाविद्यालयांचे सहयोगी अधिष्ठाता यांनी विविध मुद्यांवर आपले प्रश्न मांडून चर्चेत सहभाग नोंदविला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला डॉ. एम. आर. पाटील यांनी प्रास्ताविक केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार डॉ. सुनील भणगे यांनी मानले. या संवादासाठी विद्यापीठातील विभाग प्रमुख, प्राध्यापक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## महात्मा फुले कृषि विद्यापीठात दोन दिवसीय डाळ मिलिंग प्रशिक्षणाचे आयोजन





**दि. १२ फेब्रुवारी, २०२५.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथील विस्तार शिक्षण संचालनालय व डॉ. अण्णासाहेब शिंदे कृषि अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयातील कृषि प्रक्रिया अभियांत्रिकी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने दोन दिवसीय डाळ मिलिंग प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रशिक्षणाच्या उद्‌घाटनप्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे विस्तार शिक्षण संचालक डॉ. गोरक्ष ससाणे बोलत होते. याप्रसंगी व्यासपीठावर कृषि अभियांत्रिकी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. रविंद्र बनसोड, कृषि प्रक्रिया अभियांत्रिकी विभाग प्रमुख डॉ. कैलास कांबळे, अन्नशास्त्र व तंत्रज्ञान विभाग प्रमुख डॉ. विक्रम कड, नॅशनल ॲग्रो फाऊंडेशनचे प्रकल्प व्यवस्थापक चंद्रकांत देवरे, कृषि अभियांत्रिकी महाविद्यालयाचे सहयोगी प्राध्यापक डॉ. विलास साळवे, प्रसारण केंद्र प्रमुख डॉ. सचिन सदाफळ व जनसंपर्क अधिकारी डॉ. भगवान देशमुख उपस्थित होते.

यावेळी डॉ. गोरक्ष ससाणे म्हणाले की डाळ मिलिंग प्रशिक्षणामध्ये सहभाग घेतलेल्या प्रशिक्षणार्थींनी या प्रशिक्षणाचा फायदा घेवून आपला स्वतःचा उद्योग सुरु करावा. उद्योग सुरु केल्याने स्वंयरोजगाराबरोबर इतरांनाही रोजगार मिळतो. जास्तीत जास्त युवा उद्योजक तयार व्हावेत हा या प्रशिक्षणाचा मुख्य उद्देश आहे. उद्योजकतेतून स्वतःबरोबर समाजाचाही विकास साधता येतो. मानवी आहारात डाळिंचे महत्व अनन्यसाधारण आहे. डाळी प्रथिनांचा मुख्य स्त्रोत आहेत. आरोग्य विभागाच्या अहवालानुसार प्रत्येकाच्या आहारात दररोज ६० ग्रॅम प्रथिनांचा समावेश असल्यास आरोग्य चांगले राहते. डाळमिल या क्षेत्रातील उद्योजकांनी विपणनाच्या बाबतीत अधिक दक्ष राहिले पाहिजे. विपणनामध्ये आपल्या मालाच्या ग्रेडींग, पॅकेजींग व ब्रॅंडींग या बाबी महत्वाच्या आहेत. यावेळी डॉ. रविंद्र बनसोड म्हणाले की कडधान्य पिकांच्या काढणी पश्चात हाताळणीमध्ये २० ते ३० टक्के नुकसान हे प्रक्रियेअभावी होते. त्यामुळे कडधान्य पिकांमध्ये डाळिंवरील प्रक्रिया ही आवश्यक आहे. प्रत्येक उद्योगात आवड, ज्ञान व गुणवत्ता असणे गरजेचे असल्याचे यावेळी ते म्हणाले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. कैलास कांबळे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. विलास साळवे यांनी तर आभार डॉ. विक्रम कड

वर्ष :५, अंक क्रं. : ५०, फेब्रुवारी, २०२५ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

यांनी मानले. दोन दिवस चालणाऱ्या या प्रशिक्षणामध्ये डाळमिल प्रशिक्षण तसेच डाळ प्रक्रिया युनिटला प्रत्यक्ष भेटीचे नियोजन करण्यात आले होते. या प्रशिक्षणासाठी शेतकरी उत्पादक कंपन्यांचे अध्यक्ष तसेच त्यांचे प्रतिनिधी यांचेसह जिल्हा व जिल्ह्याबाहेरील युवा शेतकरी सहभागी झाले होते.

## अंजीर व सिताफळ संशोधन प्रकल्प, जाधववाडी येथे अंजीर आणि सीताफळ कार्यशाळा संपन्न





**दि. २८ फेब्रुवारी २०२५.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत असलेल्या अखिल भारतीय समन्वित कोरडवाहू फळपिके (अंजीर आणि सिताफळ) संशोधन प्रकल्प, जाधववाडी आणि धनश्री क्रॉप सोल्युशन्स प्रायव्हेट लिमिटेड, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने अंजीर आणि सिताफळ कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी धनश्री क्रॉप सोल्युशन्सचे संचालक डॉ. शरद बऱ्हाटे, डॉ. प्रदीप दळवे, डॉ. युवराज बालगुडे व श्री. सुनील नाळे उपस्थित होते. डॉ. शरद बऱ्हाटे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. सकाळच्या सत्रात अंजीर आणि सिताफळ लागवड तंत्रज्ञान या विषयावर श्री. सुनील नाळे यांनी मार्गदर्शन केले. बहार नियोजन, पाणी व अन्नद्रव्य व्यवस्थापन याविषयी डॉ. प्रदीप दळवे यांनी तर कीड व रोग व्यवस्थापन या विषयावर डॉ. युवराज बालगुडे यांनी मार्गदर्शन केले. मार्गदर्शनानंतर शेतकऱ्यांच्या समस्यांचे निराकरण करण्यात आले. दुपारच्या सत्रात संशोधन केंद्रातील अंजीर व सिताफळ बागेस प्रत्यक्ष भेट देऊन पीक वाढीच्या विविध अवस्थांचे निरीक्षण तसेच इतर महत्त्वाचे घटक याविषयी माहिती देण्यात आली. या कार्यशाळेत पुणे, सोलापूर व अहिल्यानगर जिल्हयातील शेतकऱ्यांनी सहभाग घेतला.

## तेलबिया संशोधन केंद्र, जळगाव येथे उन्हाळी भुईमुग लागवड तंत्रज्ञान या विषयावर प्रशिक्षण व पीक पाहणी कार्यक्रम संपन्न





**दि. ६ फेब्रुवारी, २०२५.** तेलबिया संशोधन केंद्र, जळगाव तसेच भारतीय भुईमुग संशोधन संस्था, जुनागढ यांच्या संयुक्त विद्यमाने भुजगाव, ता. धडगाव, जि. नंदुरबार येथे उन्हाळी भुईमुग लागवड तंत्रज्ञान या विषयावर शेतकरी प्रशिक्षण व पीक पाहणी कार्यक्रम घेण्यात आला. या

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी तेलबिया संशोधन केंद्राचे प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. डी.व्ही. दहात होते. यावेळी वनस्पती रोगशास्त्राचे सहयोगी प्राध्यापक डॉ. भानुदास गमे, नंदुरबार येथील कृषि विज्ञान केंद्राचे किटकशास्त्र विशेषज्ञ डॉ. पद्माकर कुंदे, कृषिविद्या विशेषज्ञ डॉ. उमेश पाटिल व तेलबिया संशोधन केंद्राचे कनिष्ठ संशोधन सहाय्यक श्री. संजय नंदनवार उपस्थित होते. अध्यक्षीय मार्गदर्शन करतांना डॉ. डी. व्ही. दहात यांनी भुईमुगाचे विविध वाण व उत्पादन या विषयावर विस्तृत मार्गदर्शन केले. भुईमुग वाढीसाठी विद्यापीठाने विकसित केलेल्या तंत्रज्ञानाबद्दल त्यांनी शेतकऱ्यांना माहिती दिली. डॉ. भानुदास गमे यांनी भुईमुग या पिकावरचे रोग व त्यांचे नियंत्रण याबद्दल सखोल माहिती शेतकऱ्यांना दिली. त्याचबरोबर बियाणे प्रक्रियेचे महत्त्व व बिजप्रक्रिया कशी करावी याबद्दल मार्गदर्शन केले. डॉ. उमेश पाटील यांनी उन्हाळी भुईमुगाचे लागवड तंत्रज्ञान या विषयावर शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले तसेच डॉ. पद्माकर कुंदे यांनी शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. संजय नंदनवार यांनी केले. यावेळी धडगाव तालुका येथील पुरुष व महिला शेतकरी मोठया संख्येने उपस्थित होते.

## जळगाव येथील तेलबिया संशोधन केंद्रामार्फत शेतकरी मेळाव्याचे आयोजन





**दि. २८ फेब्रुवारी, २०२५.** तेलबिया संशोधन केंद्र, जळगाव, भारतीय तेलबिया आणि उत्पादन निर्यात प्रोत्साहन परिषद, मुंबई व अखिल भारतीय समन्वित तीळ संशोधन प्रकल्प जबलपूर यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हा नियोजन भवन, जळगाव या ठिकाणी शेतकरी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे संशोधन संचालक डॉ.विठ्ठल शिर्के होते. यावेळी व्यासपीठावर भारतीय तेलबिया आणि उत्पादन निर्यात प्रोत्साहन परिषदेचे उपसचिव इंजी. आशिष पाटील, कृषि शिक्षण तंत्रज्ञानचे सहयोगी अधिष्ठाता डॉ प्रशांत बोडके, भारतीय समन्वित तीळ संशोधन प्रकल्पाचे प्रकल्प समन्वयक डॉ. आनंदकुमार विश्वकर्मा, तेलबिया संशोधन केंद्राचे प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. दीपक दहात, नागपूर येथील वनामतीचे अप्पर संचालक श्री. शिवाजीराव जगताप, आत्माचे माजी प्रकल्प संचालक श्री. अनिल भोकरे, तीळ पैदासकार डॉ. सुमेरसिंग राजपूत, केळी संशोधन केंद्राचे उद्यानविद्यावेत्ता डॉ. भोसले, कृषि विज्ञान केंद्राचे कार्यक्रम समन्वयक डॉ. हेमंत बाहेती व कृषिभूषण शेतकरी श्री. समाधान पाटील उपस्थित होते.

अध्यक्षीय मार्गदर्शन करतांना डॉ.विठ्ठल शिर्के म्हणाले शारीरिक पोषणासाठी तेलवर्गीय पिकात तिळाला सर्वोच्च स्थान आहे व त्यामुळे तिळाचा वापर वाढला पाहिजे. उन्हाळी हंगामामध्ये तिळाचे क्षेत्र वाढणे गरजेचे असल्याने व त्यासाठी विद्यापीठाचे तंत्रज्ञान शेतकऱ्यांनी वापरावे असे आवाहन त्यांनी यावेळी केले. याप्रसंगी इंजी. आशिष पाटील म्हणाले की भारतीय तेलबिया आणि उत्पादन निर्यात प्रोत्साहन परिषद (खजझइएझउ) १९५६ पासून सुरु झाली आहे. सुरवातीला ती भारतीय तेलबिया आणि उत्पादन निर्यातदार संघटना (IOPEPA) म्हणून स्थापन झाली. त्यानंतर २००६ मध्ये भारत सरकारच्या वाणिज्य मंत्रालयाने तिला निर्यात प्रोत्साहन परिषद म्हणून अधिकृत दर्जा दिला. परिषदेची मुख्य कार्ये म्हणजे तेलबिया निर्यातीत गुणवत्ता वाढीसाठी जागरूकता कार्यक्रम आयोजित करणे, देशभर प्रशिक्षण उपक्रम आयोजित करणे, बाजारपेठेत प्रवेश वाढविण्यासाठी बाजार अभ्यास सुलभ करणे, सरकारी पाठिंब्याने व्यापारातील अडथळे दूर करणे, खरेदीदार–विक्रेता बैठका आणि आंतरराष्ट्रीय व्यापार प्रदर्शन सहभागाद्वारे निर्यात बाजारपेठांना चालना देणे आणि तेलबिया क्षेत्रातील व्यापक डेटाबेस आणि आकडेवारी राखणे. याव्यतिरिक्त, खजझइएझउ आपल्या सदस्यांना धोरणात्मक सल्ला देण्यासाठी सरकारी धोरणांचे विश्लेषण करते आणि क्लस्टर अभ्यास, संशोधन अहवाल, जर्नल्स आणि पीक सर्वेक्षणांद्वारे बाजार बुद्धिमत्ता प्रसारित करते. डॉ प्रशांत बोडके म्हणाले की निर्यातक्षम तीळ लागवडीकडे आपण लक्ष केंद्रित केले पाहिजे. विद्यापीठाचे तंत्रज्ञान, सुधारित वाण वापरून उत्पादकता वाढवली पाहिजे.

आंतरपीक म्हणूनही तीळ पीक आपणास घेता येऊ शकते असे त्यांनी विषद केले. यावेळी डॉ. आनंदकुमार विश्वकर्मा यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. दीपक दहात यांनी केले. तांत्रिक चर्चासत्रात इंजी. आशिष पाटील यांनी तेल आणि तेलबिया निर्यातीचा आढावा, डॉ सुमेरसिंग राजपूत यांनी तीळ पीक लागवड तंत्रज्ञान, श्री. शिवाजीराव जगताप यांनी सेंद्रिय पद्धतीने तेलबिया पिकांचे उत्पादन, डॉ. बी. सी. गमे यांनी तेलबिया पिकावरील रोग व्यवस्थापन, डॉ हेमंत बाहेती यांनी तेलबिया पिकातील कीड व्यवस्थापन या विषयावर उपस्थित शेतकरी, महिला, ग्रामीण युवक, विस्तार कार्यकर्ते यांना मार्गदर्शन केले. शेतकरी मेळाव्यासाठी प्रदर्शनात कृषि विज्ञान केंद्रातर्फे विविध गहू, ज्वारी, भुईमुग, तीळ व हरभरा पिकाचे वाण, लखपती दिदि सौ. वंदना पाटील यांनी भाजीपाल्याचे निर्जलीकरण उत्पादन, लाकडी घाण्याद्वारे तेल निर्मिती इ. जवळपास १० स्टॉल्स यावेळी लावण्यात आले होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन इंजि. वैभव सुर्यवंशी तर आभार डॉ. सुमेरसिंग राजपूत यांनी मानले. या मेळाव्यासाठी जवळपास ५०० शेतकरी, महिला, ग्रामीण युवक, विस्तार कार्यकर्ते यांनी उपस्थित राहून कार्यक्रमाचा लाभ घेतला.

## कृषि विज्ञान केंद्र, धुळे येथे कौशल्य विकास अंतर्गत दोन दिवसीय तंत्रज्ञान प्रशिक्षण संपन्न





**दि. ५ फेब्रुवारी २०२५.** कृषि विज्ञान केंद्र, धुळे आणि आत्मा, धुळे यांच्या संयुक्त विद्यमाने कृषि विज्ञान केंद्र, धुळे या ठिकाणी पशुपालक युवकांकरिता कौशल्य विकास कार्यक्रमांतर्गत दोन दिवसीय दुध व दुग्धजन्य पदार्थ उत्पादन तंत्रज्ञान प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कृषि महाविद्यालयाचे पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र विभागाचे प्राध्यापक डॉ. राहुल देसले होते. यावेळी कृषि विज्ञान केंद्राचे कार्यक्रम समन्वयक डॉ. दिनेश नांद्रे, डॉ. पंकज पाटील, श्री. जगदीश कथेपुरी, श्री. रोहित कडू, प्रा. अमृता राऊत, डॉ. धनराज चौधरी व डॉ. अतिश पाटील उपस्थित होते.

अध्यक्षीय मार्गदर्शन करतांना डॉ. राहुल देसले म्हणाले की पशुसंवर्धन करत असताना व्यवसायिक दृष्टिकोन ठेवून नियोजन करणे गरजेचे आहे. यामध्ये दुध उत्पादनाबरोबरच दुग्धजन्य पदार्थ व उत्पादन तंत्रज्ञान यावर भर देण्याची गरज आहे. यावेळी त्यांनी दुग्धजन्य पदार्थ उत्पादन तंत्रज्ञान यावर ऐतिहासिक दाखले देत उपस्थित प्रशिक्षणार्थी यांना मार्गदर्शन केले. डॉ. दिनेश नांद्रे यांनी आपल्या प्रास्ताविकात प्रशिक्षणाचा उद्देश सांगत पशुधनाचे कृषिमधील महत्व अधोरेखित केले. या दोन दिवसीय तांत्रिक मार्गदर्शनामध्ये डॉ. धनराज चौधरी यांनी प्रात्यक्षिकामधून दुग्ध व दुग्धजन्य पदार्थ उत्पादन तंत्रज्ञान यावर मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. धनराज चौधरी यांनी तर आभार श्री. जगदीश कथेपुरी यांनी मानले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी कृषि विज्ञान केंद्र, धुळे येथील सर्व शात्रज्ञ, अधिकारी, कर्मचारी, तसेच पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र विभाग, आत्मा, धुळे येथील सर्व अधिकारी, कर्मचारी यांचे सहकार्य लाभले.

## कृषि विज्ञान केंद्र, धुळे येथे कृषि तंत्रज्ञान महोत्सव आणि किसान सन्मान समारंभ कार्यक्रम संपन्न

**दि. २४ फेब्रुवारी, २०२५.** कृषि विज्ञान केंद्र, धुळे येथे कृषि विज्ञान केंद्र, धुळे, कृषि विभाग, धुळे आणि आत्मा, धुळे यांच्या संयुक्त विद्यमाने कृषि तंत्रज्ञान महोत्सव आणि प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेंतर्गत किसान सन्मान समारोह या कार्यक्रमात पी.एम. किसान सन्मान निधी योजनेच्या १९ व्या हप्त्याचे वितरण पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांच्या हस्ते भागलपुर, बिहार येथे झालेल्या कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण





करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे विस्तार शिक्षण संचालक डॉ. गोरक्ष ससाणे होते. यावेळी साक्रीचे आमदार सौ. मंजुळाताई गावित, धुळे शहराचे आमदार श्री. अनुपभैय्या अग्रवाल, सौ. अल्पा अनुप अग्रवाल, धुळे ग्रामीणचे आमदार श्री. राघवेंद्र (राम) भदाणे, धुळेचे जिल्हाधिकारी श्री. जितेंद्र पापळकर, धुळेचे प्रभारी जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी श्री. बापू गावित, धुळे (आत्मा) प्रकल्प संचालक श्री. हितेंद्र सोनवणे व कृषि विज्ञान केंद्राचे कार्यक्रम समन्वयक डॉ. दिनेश नांद्रे व्यासपीठावर उपस्थित होते.

याप्रसंगी डॉ. गोरक्ष ससाणे यांनी अध्यक्षीय भाषणात महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी संशोधित तंत्रज्ञानाविषयी माहिती देत उपस्थितांना मार्गदर्शन केले. तसेच विद्यापीठाची कृषिदर्शनी प्रत्येक शेतकरी बांधवांनी आपल्या संग्रही ठेवण्याचे आवाहन केले. श्री. जितेंद्र पापळकर यांनी आपल्या भाषणात सांगितले की अद्ययावत कृषि तंत्रज्ञान शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी हा कार्यक्रम होत असून शेतकऱ्यांनी एकत्र येऊन अमुलाग्र बदल घडविणे महत्त्वाचे आहे.

यावेळी झालेल्या कार्यक्रमात धुळे जिल्ह्यातील ३० प्रगतशील शेतकऱ्यांचा सन्मान चिन्ह देऊन गौरव करण्यात आला. यावेळी धुळे जिल्ह्यातील विविध शेतकरी उत्पादक गट, अन्नप्रक्रिया समूह व खाद्य प्रक्रिया उद्योग, महिला सहाय्यता समूह गट यांचे प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. यावेळी मान्यवरांनी सदर प्रदर्शनाची पाहणी करुन शेतकरी बांधव व महिला गटांनी चांगल्या प्रकारे पिकविलेल्या व उत्पादीत केलेल्या शेतमालाची माहिती घेतली व शेतकऱ्यांचे कौतुक केले. तसेच कृषि विज्ञान केंद्राच्या प्रक्षेत्रावरील विविध पिकांची शिवार फेरीच्या माध्यमातून पाहणी करण्यात आली. आमदार सौ. मंजुळा गावित यांनी सन्मानपात्र शेतकऱ्यांचे अभिनंदन केले. शेतकरी सुखी होईल अशा योजना शासन राबवत असून ड्रोन सारखी फवारणी यंत्र फायदेशीर ठरत असल्याचे यावेळी त्यांनी नमूद केले. आमदार श्री. राघवेंद्र भदाणे यांनी मार्गदर्शनात कृषि बरोबर प्रक्रिया उद्योगांमध्ये जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी सहभाग घेत प्रक्रिया उपयुक्त पदार्थांचे विक्री विपणनाचे कौशल्य आत्मसात करून पुढील नियोजन करण्याचे आवाहन केले.

तांत्रिक सत्रामध्ये डॉ. अतिश पाटील, श्री. रोहित कडू, डॉ. धनराज चौधरी, डॉ. पंकज पाटील, प्रगतशील शेतकरी श्री. दिलीप पाटील यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. दिनेश नांद्रे यांनी केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन श्री. जगदीश काथेपुरी यांनी तर आभार डॉ. धनराज चौधरी यांनी मानले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी कृषि विज्ञान केंद्र, धुळे, कृषि विभाग, धुळे, आत्मा, धुळे व महाविद्यालयाचे सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांचे सहकार्य लाभले.

## कृषि विज्ञान केंद्र, धुळे येथे कृषि तंत्रज्ञान महोत्सवअंतर्गत महिला मेळावा संपन्न

**दि. २५ फेब्रुवारी, २०२५.** कृषि विज्ञान केंद्र, धुळे येथे कृषि विज्ञान केंद्र, धुळे, कृषि विभाग, धुळे आणि आत्मा, धुळे यांच्या संयुक्त विद्यमाने कृषि तंत्रज्ञान महोत्सवअंतर्गत महिला मेळावा उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. बबनराव इल्हे होते. याप्रसंगी प्रमुख मार्गदर्शक म्हणुन धुळे येथील पंचायत समितीचे महिला व बालकल्याण, विस्तार अधिकारी श्रीमती सुजाता पाटील उपस्थित होत्या. प्रमुख उपस्थितीमध्ये धुळे येथील महिला आर्थिक विकास महामंडळ प्रकल्पाचे सल्लागार श्रीमती सीमा पवार, कृषि विज्ञान केंद्राचे कार्यक्रम समन्वयक डॉ. दिनेश नांद्रे, कृषि विज्ञान केंद्राचे शास्त्रज्ञ डॉ. पंकज पाटील, श्री. रोहित कडू, श्री. जगदीश काथेपुरी, डॉ. धनराज चौधरी, डॉ. आतिश पाटील, जयराम गावित व्यासपीठावर उपस्थित होते.

अध्यक्षीय मार्गदर्शनात डॉ. बबनराव इल्हे यांनी महिलांनी शेती करत असताना नवनवीन तंत्रज्ञान आत्मसात करत शेतीमध्ये पिकांची



फेरपालट कशा पद्धतीने करावी तसेच फक्त शेतीवर अवलंबून न राहता कृषि प्रक्रिया याविषयी जास्तीत जास्त माहिती घेत पुढील नियोजन करावे असे आवाहन करत मार्गदर्शन केले. तांत्रिक सत्रामध्ये श्रीमती सुजाता पाटील यांनी महिला सशक्तिकरण सबलीकरण तसेच तरुण युवतींना शेतकरीच नवरा का हवा या विषयावर दाखले देत उपस्थितांना मार्गदर्शन केले. श्रीमती सीमा पवार यांनी महिला आर्थिक विकास महामंडळाच्या योजना तसेच विक्री विपणन या विषयावर मार्गदर्शन केले. डॉ. दिनेश नांद्रे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. या प्रसंगी सर्व मान्यवरांनी कृषि विज्ञान केंद्र प्रक्षेत्रावरील विविध पिके, शिवार फेरीच्या माध्यमातून पाहणी करण्यात आली. कृषि विज्ञान केंद्राचे विशेष कौतुक व अभिनंदन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. धनराज चौधरी तर आभार जगदीश काथेपुरी यांनी मानले. सदर महिला मेळाव्याकरिता धुळे जिल्ह्यातील माविम व उमेद महिला बचत गटाच्या महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. कार्यक्रमाच्या यशस्वी होणेसाठी कृषि विज्ञान केंद्र, धुळे, कृषि विभाग, धुळे, आत्मा, धुळे व माविम, धुळे येथील सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांचे सहकार्य लाभले.

## कृषि विज्ञान केंद्र, बोरगावच्या शास्त्रज्ञांचे गांडूळ खत निर्मितीबाबत मार्गदर्शन



**दि. ११ फेब्रुवारी, २०२५.** कृषि विज्ञान केंद्र, बोरगाव व कृषि विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने दत्तक ग्राम चिंचणेर निंब येथे महिला बचत गटासाठी हळदी–कुंकू कार्यक्रमाचे आयोजन करून स्वच्छता कृती आराखडाअंतर्गत प्रत्येक गटाला एक, असे गांडूळ खत निर्मितीसाठी मोफत बेड वाटपाचा अनोखा उपक्रम राबविण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कृषि विज्ञान केंद्राचे कार्यक्रम समन्वयक डॉ. महेश बाबर होते. यावेळी कार्यक्रम सहाय्यक संग्राम पाटील, पीक संरक्षण शास्त्रज्ञ डॉ. स्वाती गुरवे, भूषण यादगिरवार, सागर सकटे, डॉ. कल्याण बाबर, शितल काकडे व कृषि सहायक धनाजी फडतरे उपस्थित होते.

यावेळी डॉ. महेश बाबर मार्गदर्शन करतांना म्हणाले की  गटातील महिलांनी एकत्र येऊन सेंद्रिय निविष्ठा उदा. गांडूळ खत, दशपर्णी अर्क, वर्मी वॉश, जीवामृत यांची मोठ्या प्रमाणात निर्मिती करून विक्री करावी व त्यासाठी लागणारे तांत्रिक मार्गदर्शन करण्यासाठी कृषि विज्ञान केंद्र, बोरगाव, सातारा कायम तत्पर असेल. श्री. संग्राम पाटील यांनी प्रत्यक्ष पद्धतीने जीवामृत तयार करणे तसेच गांडूळ खताचे बेड भरणे याचे प्रात्यक्षिक महिलांना करून दाखवले. डॉ. स्वाती गुरवे यांनी पीक उत्पादन वाढीसाठी मधुमक्षिका महत्त्वाचा घटक असून महिला वर्ग सहज करू शकणारा, चांगला शेतीपूर्वक जोडधंदा असून जास्तीत जास्त महिलांनी त्याकडे वळावे असे सांगितले. श्री. धनाजी फडतरे आपल्या

प्रास्ताविकात चिंचणेर गावातच मोठ्या प्रमाणात सेंद्रिय शेती करत असून गटाच्या मार्फत गांडूळ खतनिर्मिती करून विक्री करावी असे सांगितले. यावेळी प्रत्येक महिलेला वाणाच्या स्वरूपात एक–एक लिंबाचे रोप देण्यात आले. याप्रसंगी उमेदचे श्री. अमोल पांढरपट्टे यांनी उमेद राबवीत असलेल्या बाबींबद्दल माहिती दिली. उमेदच्या तालुका समन्वयक सुचित्रा गायकवाड यांनी आभार मानले.

## कृषि विद्यापीठात शिष्यवृत्ती पुरस्कार वितरण समारंभ संपन्न





**दि. २८ फेब्रुवारी, २०२५.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी, जॉन डिअर, पुणे व ग्रामीण श्रमिक प्रतिष्ठान, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने कृषि अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या सभागृहात शिष्यवृत्ती पुरस्कार वितरण समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे विस्तार शिक्षण संचालक डॉ. गोरक्ष ससाणे होते. यावेळी कृषि अभियांत्रिकी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. रविंद्र बनसोड, जॉन डिअर कंपनीचे वित्त विभाग प्रमुख श्री. महेश पाटणकर, कंपनीच्या सामाजीक संशोधन शाखेचे श्री. रविंद्र कासार, कंपनीचे उत्पादन मार्केट विभाग प्रमुख श्री. रोहन जगदाळे, कृषि यंत्रे व शक्ती विभाग प्रमुख डॉ. सचिन नलावडे व ग्रामीण श्रमिक प्रतिष्ठानचे कार्यकारी विश्वस्त श्री. प्रशांत सुडे उपस्थित होते.

यावेळी डॉ. गोरक्ष ससाणे मार्गदर्शन करतांना म्हणाले की महाविद्यालयीन शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांपैकी काही विद्यार्थ्यांच्या पालकांची आर्थिक परिस्थिती बेताची असते. यामुळे या विद्यार्थ्यांना शैक्षणिक सत्राची फी, मेसचा खर्च इ. आवश्यक गोष्टींसाठी लागणारा खर्च करणेसुध्दा शक्य होत नाही. अशा या हुशार व होतकरु विद्यार्थ्यांना जॉन डिअरच्या माध्यमातून ग्रामीण श्रमिक प्रतिष्ठानसारख्या संस्था सहकार्याच्या भावनेने शिष्यवृत्तीच्या माध्यमातून मदत करतात, ही फार महत्वाची बाब आहे. अशा वेळी ही शिष्यवृत्ती घेवून शिक्षण पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांनी आपणही या समाजाचे काही देणे लागतो ही भावना कायम मनामध्ये जागृत ठेवली पाहिजे, त्याप्रमाणे आचरण केले पाहिजे.

यावेळी डॉ. रविंद्र बनसोड आपल्या मार्गदर्शनात म्हणाले की शिष्यवृत्ती मिळविलेल्या विद्यार्थ्यांनी कठोर परिश्रम करुन आपले भविष्य घडवावे. तुम्ही भविष्यात येणाऱ्या समस्येला यशामध्ये परावर्तीत करा असा मोलाचा संदेश त्यांनी यावेळी विद्यार्थ्यांना दिला. श्री. रोहन जगदाळे आपल्या मार्गदर्शनात म्हणाले की तुम्हाला मिळालेल्या संधीचा फायदा तुम्ही घेतला नाही तर तुम्ही जिंकण्याच्या स्पर्धेतून बाहेर पडाल. तुम्ही कधीही स्वतःला इतरांपेक्षा कमी समजू नका. आपल्या ध्येयावर लक्ष केंद्रित केल्यास यश नक्कीच मिळेल. याप्रसंगी श्री. रविंद्र कासार व श्री. महेश पालकर यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री. प्रशांत सुडे यांनी केले. यावेळी मान्यवरांच्या हस्ते शिष्यवृत्ती मिळालेल्या विद्यार्थ्यांना सन्मानपत्र व भेट वस्तूंचे वाटप करण्यात आले. यामध्ये आचार्य पदवीचे चार, पदव्युत्तरचे २५ व पदवीच्या १६ विद्यार्थ्यांचा समावेश होता. यावेळी शिष्यवृत्ती प्राप्त श्री. दिलीप रणदिवे, कु. सपना मगर, श्री. श्रध्दानंद धबदुले व कु. अंजली देशमुख या विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी या शिष्यवृत्ती प्राप्त विद्यार्थ्यांच्या निवड चाचणी प्रक्रियेत सहभागी असणाऱ्या डॉ. विजय पाटील, डॉ. सुनील भणगे, डॉ. बी. एम. भालेराव, डॉ. भाईदास देवरे, डॉ. सुनील फुलसावंगे, डॉ. बाबासाहेब भिंगारदे, डॉ. अधिर आहेर, डॉ. विलास साळवे, श्री. तमनर, श्रीमती स्वाती शिंदे व ग्रामीण श्रमिक प्रतिष्ठानचे अभय घाडगे यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. सुनील फुलसावंगे यांनी तर आभार श्रमिक प्रतिष्ठानचे कार्यक्रम व्यवस्थापक श्री. सत्यजीत गुरव यांनी मानले. या कार्यक्रमासाठी ग्रामीण श्रमिक प्रतिष्ठानचे

पदाधिकारी तसेच विद्यापीठातील कृषि प्रक्रिया अभियांत्रिकीचे विभाग प्रमुख डॉ. कैलास कांबळे, प्राध्यापक, कर्मचारी व शिष्यवृत्ती प्राप्त विद्यार्थी–विद्यार्थिनी उपस्थित होते.

## कृषि महाविद्यालये व कृषि अभियांत्रिकी महाविद्यालयामधील विविध उपक्रम

### महात्मा फुले कृषि विद्यापीठातील कृषि अभियांत्रिकी महाविद्यालयात पालकदिन–२०२५ उत्साहात संपन्न








**दि. २४ फेब्रुवारी, २०२५.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथील डॉ. अण्णासाहेब शिंदे कृषि अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयामध्ये पालक दिन–२०२५ उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमांतर्गत डॉ. नानासाहेब पवार सभागृहात वार्षिक पारितोषीक वितरण समारंभ व विद्यार्थी गुणगौरव सोहळा आयोजीत करण्यात आला होता. यावेळी या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरु डॉ. साताप्पा खरबडे होते. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणुन झारखंड राज्यातील पोलिस उपमहानिरीक्षक श्री. मनोज चोथे उपस्थित होते. यावेळी व्यासपीठावर कृषि अभियांत्रिकी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. रविंद्र बनसोड, काष्टी येथील कृषि विज्ञान संकुलाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. सचिन नांदगुडे, कुलसचिव डॉ. नितीन दानवले, कृषि यंत्रे व शक्ती विभाग प्रमुख डॉ. सचिन नलावडे, अन्नशास्त्र व तंत्रज्ञान विभाग प्रमुख डॉ. विक्रम कड, कृषि प्रक्रिया अभियांत्रिकी विभाग प्रमुख डॉ. कैलास कांबळे, जलसिंचन व निचरा अभियांत्रिकी विभाग प्रमुख डॉ. शैलेंद्र गाडगे, लेफ्ट. डॉ. सुनील फुलसावंगे, सहाय्यक कुलसचिव श्री. वैभव बारटक्के, पारनेर तालुक्यातील सरपंच पंकज कारखीले, स्नेहसंमेलन सचिव कु. दर्शना पाटील व विद्यार्थी परिषदेचे सभापती श्री. विशाल हराळ उपस्थित होते.

यावेळी अध्यक्षीय मार्गदर्शन करतांना डॉ. साताप्पा खरबडे म्हणाले की भविष्यातील जग हे अत्यंत स्पर्धात्मक असून कृत्रिम बुध्दिमत्ता यामध्ये महत्वाची भुमिका बजावणार आहे. यासाठी विद्यार्थ्यांनी संगणक तसेच कृत्रिम बुध्दिमत्ता या क्षेत्रातील अद्ययावत तंत्रज्ञान अवगत केले पाहिजे. कृषि अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी शिक्षण पूर्ण करुन कृषि व औद्योगीक तसेच प्रशासकीय क्षेत्रात उत्कृष्ट

कामगिरी करुन विद्यापीठाचे नांव मोठे केले आहे. त्याच पध्दतीने सध्या शिक्षण घेत असलेले विद्यार्थी भविष्यात आपल्या महाविद्यालयाचे नांव मोठे करतील अशी अपेक्षा त्यांनी यावेळी बोलतांना व्यक्त केली. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे श्री. मनोज चोथे उपस्थितांना मार्गदर्शन करतांना म्हणाले की महाविद्यालयामधील आजचा दिवस म्हणजे भविष्यातील स्वप्ने पूर्ण करण्यासाठी संकल्प करण्याचा दिवस आहे. तुम्ही ज्या क्षेत्रामध्ये जाण्याचे निश्चित कराल त्यासाठी तुमचे प्रयत्न हे सतत व निरंतर ठेवा. इच्छा व दृढशक्ती असेल तर कोणतीही गोष्ट अशक्य नाही. हसत राहा–आनंदी राहा असा मोलाचा सल्ला त्यांनी यावेळी दिला.

डॉ. रविंद्र बनसोड आपल्या मार्गदर्शनात म्हणाले की विद्यार्थ्यांनी नेहमी चौकटीच्या बाहेर जावून विचार केला पाहिजे. स्पर्धा परिक्षेव्यतिरीक्त अन्य क्षेत्रातही तुम्ही चमकदार कामगिरी करु शकता. त्यासाठी तुम्हाला नकारात्मक गोष्टी बाजुला सारुन नविन आव्हाणे स्विकारावी लागतील. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. सचिन नलावडे यांनी केले. प्रमुख पाहुण्यांची ओळख श्री. विशाल हराळ याने करुन दिली.वार्षिक अहवालाचे वाचन कु. दर्शना पाटील हिने केले. यावेळी मान्यवरांच्या शुभहस्ते महाविद्यालयाच्या माहिती पुस्तिकेचे विमोचन करण्यात आले. याप्रसंगी क्रीडा क्षेत्रातील वैयक्तीक खेळाबरोबरच खो–खो, बास्केटबॉल, टेबल टेनीस, क्रिकेट, कबड्डी, हॉलीबॉल, फुटबॉल, एन.सी.सी., तिफण स्पर्धा याबरोबरच विविध स्पर्धा परिक्षांमध्ये यश मिळविलेल्या विद्यार्थी, विद्यार्थीनी यांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिके व प्रशस्तीपत्रे देवून गौरविण्यात आले. यामध्ये चतुर्थ वर्षाच्या विद्यार्थ्यांना सर्वसाधारण विजेतेपदाचा करंडक देवून गौरविण्यात आले. कार्यक्रमाचे आभार डॉ. कैलास कांबळे यांनी मानले. या कार्यक्रमासाठी कृषि अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राध्यापक, कर्मचारी, विद्यार्थी, विद्यार्थीनी तसेच पालकवर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विद्यार्थी परिषदेचे उपाध्यक्ष डॉ. सचिन नलावडे, शारिरीक शिक्षण निदेशक श्री. वैभव बारटक्के तसेच महाविद्यालयाच्या सर्व विद्यार्थ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

## कृषि महाविद्यालय, धुळे येथे ३९५ वी शिवजयंती मोठ्या उत्साहात साजरी








**दि. १९ फेब्रुवारी, २०२५.** कृषि महाविद्यालय, धुळे येथे शिवजयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. शिवजयंतीची सुरुवात पहाटे सहा वाजता शिवतीर्थावरून ज्योत आणण्यापासून झाली. त्यानंतर कृषि महाविद्यालयाच्या परिसरात शिवमूर्ती व शिवज्योतीची मोठ्या जल्लोषात मिरवणूक काढण्यात आली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. बी. एम. इल्हे होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ साहित्यिक व अखिल भारतीय साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष डॉ. श्रीपाल सबनीस उपस्थित होते.

याप्रसंगी अध्यक्षीय मार्गदर्शन करतांना डॉ. बी. एम. इल्हे म्हणाले की महाराजांनी शत्रूंनाच हरवलेलं नाही तर एक मजबूत आणि सक्षम प्रशासन उभे केले. त्यांनी स्त्रियांचा आदर केला. प्रजेला नेहमीच सुरक्षा प्रदान केली तसेच शेतकऱ्यांच्या समस्या सोडविल्या. त्यांनी न्याय, समानता, धर्म निरपेक्षतेचा संदेश दिला. लहान वयापासूनच शिवाजी महाराज हे पराक्रमी होते. डॉ. सबनीस मार्गदर्शन करतांना म्हणाले की महापुरुषाचं जीवन आकलन करावे, अभ्यासावे आणि जमेल तेवढे आचरणात आणावे यासाठीच महापुरुषांचा इतिहास प्रेरक आणि मार्गदर्शक असतो. पृथ्वीतलावरचा एकमेव राजा म्हणजे शिवाजी राजा ज्यांनी सर्व जाती–धर्माच्या रयतेला सर्वार्थाने न्याय मिळवून दिला,

म्हणूनच लोकशाहीच्या आधुनिक कालखंडात सुद्धा शिवरायांचे स्मरण होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व पाहुण्यांची ओळख विद्यार्थी परिषदेचे उपाध्यक्ष डॉ. आर. जे. देसले यांनी करून दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. अनिशा देशमुख व श्री. अजय धुमाळ या विद्यार्थ्यांनी केले तर आभार विद्यार्थी कल्याण अधिकारी प्रा. जे. एस. सुर्यवंशी यांनी मानले. या कार्यक्रमास महाविद्यालयातील प्राध्यापक, अधिकारी, कर्मचारी, विद्यार्थी व विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## कृषि महाविद्यालय, हाळगाव येथे माय भारत पोर्टलचे प्रशिक्षण संपन्न





**दि. २ फेब्रुवारी, २०२५.** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कृषि महाविद्यालय, हाळगाव येथे माय भारत पोर्टल या योजनेअंतर्गत कृषि महाविद्यालयांचा सहभाग वाढविण्याच्या उद्देशाने माय भारत पोर्टलचे प्रशिक्षण पार पडले. महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे अधिष्ठाता डॉ. सात्तापा खरबडे यांच्या निर्देशानुसार या प्रशिक्षणाचे आयोजन कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. अनिल काळे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते. जिल्हा युवा अधिकारी श्री. संकल्प शुक्ला यांनी माय भारत पोर्टलवर नोंदणी करण्यासाठी सर्व युवा विद्यार्थ्यांना प्रोत्साहित केले. सदर प्रशिक्षणादरम्यान माय भारत पोर्टलवर नोंदणी करण्याचे प्रात्यक्षिक त्यांनी विद्यार्थ्यांना दाखवले. कृषि व संलग्न क्षेत्रातील शेतकऱ्यांच्या समृद्धीसाठी युवकांना माय भारत पोर्टलच्या माध्यमातून कसे सहकार्य करता येईल हे समजावून सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. अनिल काळे यांनी केले. प्रशिक्षणासाठी विद्यार्थी परिषदेचे उपाध्यक्ष डॉ. दत्तात्रय सोनावणे, विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. विवेकानंद कुलकर्णी, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. पोपट पवार, डॉ. प्रेरणा भोसले, डॉ. गोकुळ वामन, प्रा. अरुण पाळंदे, डॉ. नजीर तांबोळी, डॉ. मनोज गुड, डॉ. नीलेश लांडे, डॉ. महेश निकम, डॉ. अंबादास मेहेत्रे, कु. अर्चना महाजन, डॉ. उत्कर्षा गवारे, डॉ. प्रणाली ठाकरे, डॉ. किरण चौधरी, डॉ. अनिकेत गायकवाड, श्री. महादू शिंदे, शिक्षकेतर कर्मचारी श्री. संजय आढाव, श्री. महेश सुरवसे, श्री. संभाजी ठवाळ, श्री. सुरेश मकरे, श्री. किरण अडसुर, श्री. प्रदीप धारेकर उपस्थित होते. सूत्रसंचालन डॉ. विवेकानंद कुलकर्णी यांनी केले तर आभार डॉ. उत्कर्षा गवारे यांनी मानले.

## छत्रपती शिवाजी महाराज कृषि विज्ञान संकुल, काष्टी येथे मानसिक ताण तणाव व्यवस्थापन या विषयावर चर्चासत्र संपन्न

**दि. २७ फेब्रुवारी, २०२५.** छत्रपती शिवाजी महाराज कृषि विज्ञान संकुल, काष्टी येथे दि. २५ ते २७ फेब्रुवारी, २०२५ दरम्यान मानसिक ताण तणाव व्यवस्थापन या विषयावर चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संकुल प्रमुख डॉ. सचिनकुमार नांदगुडे होते. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणुन व्याख्याते नाशिक येथील mpowermind संस्थेचे फेलो श्री. मनीष सूर्यवंशी उपस्थित होते. यावेळी अन्नतंत्रज्ञान महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता प्रा. विवेक कानवडे, प्राध्यापक व वसतिगृहाचे कुलमंत्री डॉ. संजय पाटील, सहाय्यक प्राध्यापक डॉ. दिनेश बिरारी, विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. प्रशांत सोनवणे, राष्ट्रीय सेवा योजनेचे प्रमुख डॉ. राहुल खुळे, सहाय्यक कुलसचिव श्री. नारायण पाठक, सहाय्यक विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. अमृत खैरे, डॉ. सुदामा काकडे, डॉ. मनोज पटोकार, डॉ. गौरव कचवे आदी उपस्थित होते.

डॉ. सचिनकुमार नांदगुडे यावेळी म्हणाले की आजच्या धकाधकीच्या युगात कामाच्या विविधांगी स्वरूपामुळे आपले मानसिक




स्वास्थ सुदृढ ठेवणे गरजेचे आहे. श्री. मनीष सूर्यवंशी मार्गदर्शन करतांना म्हणाले की आजच्या परिस्थितीचा विचार करता स्वयंनियंत्रणासाठी मानसशास्त्रीय संकल्पना समजावून घेऊन त्याचा योग्य वापर करणे गरजेचे आहे. कामाचा अवास्तव ताण व तंत्रज्ञानावर असलेले अवलंबत्व यामुळे आज चिंता, नैराश्य, मानसिक अस्थिरता आणि व्यसन यामुळे जगणे अवघड झालेले आहे. त्यासाठी मेडीटेशन, व्यायाम व योग्य आहार ह्या बाबी दैनंदिन आयुष्यात अंगीकारायला हव्या. डॉ. सोमनाथ सोनवणे यांनी मानसिक तणाव नियंत्रित ठेवण्यासाठी निरोगी सवयी जतन करण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. प्रशांत सोनवणे यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. अमृत खैरे यांनी केले तर आभार डॉ. राहुल खुळे यांनी मानले.

## कृषि महाविद्यालय, कोल्हापूर अंतर्गत राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष श्रमसंस्कार शिबिर संपन्न



**दि. ७ फेब्रुवारी, २०२५.** कोल्हापूर येथील राजर्षी छत्रपती शाहू महाराज कृषि महाविद्यालयांतर्गत राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष श्रमसंस्कार शिबिर शिंगणापूर या गावी घेण्यात आले. या शिबिराच्या समारोप प्रसंगी सहयोगी अधिष्ठाता डॉ.सतीश बुलबुले, शिवाजी विद्यापीठाच्या यूजीसी सेंटरचे संचालक प्रा. अविनाश भाले उपस्थित होते. युथ फॉर माय भारत हे यावर्षीच्या शिबिराचे घोषवाक्य होते. या घोषवाक्यास अनुसरून युवक विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होण्याच्या दृष्टीने शिबिरामध्ये विविध बाबींचा समावेश करण्यात आला होता. यामध्ये विद्यार्थ्यांसाठी व्यक्तिमत्व विकास, व्यवसाय संधी, नेतृत्व कौशल्य या विषयावरील व्याख्यानमालांचे आयोजन करण्यात आले होते. तसेच ग्रामस्थ आणि शेतकरी बांधव यांच्यासाठी शेती विषयक व्याख्यानमालांचे आयोजन करण्यात आले होते.

शिबिराच्या उद्घाटन आणि समारोप कार्यक्रमादरम्यान डॉ.सतीश बुलबुले यांनी विद्यार्थ्यांना श्रमसंस्कार शिबिरामध्ये घेतलेल्या शिक्षणाचा आपल्या दैनंदिन जीवनात समावेश करून सामाजिक योगदान देण्यासाठी प्रयत्नशील राहावे असे आवाहन केले. यावेळी प्रा. अविनाश भाले यांनी श्रमसंस्कार शिबिराच्या माध्यमातून समाजमन समजून घेणे आणि एकमेकांसोबत काम करून मैत्री भावना वृध्दींगत करून समाजसेवेचा वारसा अनेकांपर्यंत पोहचविण्यासाठी तसेच समाजात आदर्श व्यक्ती म्हणून प्रयत्नशील राहण्याचे आवाहन शिबिरार्थी

विद्यार्थ्यांना केले. या शिबिरात शेतीविषयक व्याख्यानांमध्ये मका पैदासकार डॉ. सुनील कराड, कीटकशास्त्र विभागाचे प्राध्यापक डॉ. अभयकुमार बागडे, उद्यानविद्या विभागाचे प्रा. सीमा सरवदे, दुग्धशास्त्र विभागाचे डॉ. ज्ञानेश्वर पतंगे, वेलनेस कोच श्री. दिनेश माळी, शिवव्याख्याते श्री. उदय मोरे, श्री. संतोष पाटील व श्री. रामेश्वरी कांबळे यांनी विविध विषयांवर मार्गदर्शन केले

या शिबिरादरम्यान अनेक सामाजिक विषयांवर जनजागृती करण्याच्या उद्देशाने विद्यार्थ्यांनी विविध पथनाट्य तसेच प्रभात फेरीचे नियोजन केले होते. तसेच गावातील महिला आणि मुलींना मासिक पाळी गैरसमज निराकरण या विषयावर प्रबोधन करण्यासाठी आंतरराष्ट्रीय आणि राष्ट्रीय पातळीवर १८ अवॉर्ड्स मिळालेला मंडळ आभारी आहे हा चित्रपट दाखवण्यात आला. श्री. मकरंद लोहार यांनी व्यसनमुक्ती आणि मधुमेहमुक्ती याबाबत प्रबोधन केले. यावेळी शिंगणापूर गावच्या सरपंच सौ. रसिका पाटील यांनी विद्यार्थिनी गावामध्ये केलेल्या श्रमदानाचे कौतुक केले. शिबिरादरम्यान विद्यार्थ्यांना वास्तव्यास कोणतीही अडचण येऊ नये यासाठी गावातील सामाजिक कार्यकर्ते श्री अमर पाटील, कॅप्टन उत्तम पाटील, श्री.प्रकाश निंबाळकर, श्री. अर्जुन म्हसकर, श्री महेश पाटील आदींनी यांनी मोलाचे सहकार्य केले. शिबिराच्या शिस्तबद्ध नियोजनासाठी विद्यार्थी परिषद उपाध्यक्ष डॉ. शैलेश कांबळे आणि विद्यार्थी कल्याण अधिकारी इंजि. अजय देशपांडे यांचे मार्गदर्शनाखाली शिबिराचे यशस्वी आयोजन डॉ. मनिषा मोटे आणि राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. मोहनराव जाधव यांनी केले. शिबिरातील विविध कार्यक्रमांसाठी आर्या पवार, रुपेश पवार, कार्तिक सोनूने, क्रांतिसिंह खरात, वसुंधरा वाडकर, दिव्या कांबळे, धनश्री माने, महेक मुजावर, निखिल काटकर, धनंजय निंबाळे आदी स्वयंसेवक विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

## कृषि महाविद्यालय, मुक्ताईनगर येथे गुरु रविदास यांची जयंती साजरी



**दि. १२ फेब्रुवारी, २०२५.** कृषि महाविद्यालय, मुक्ताईनगर येथे गुरु रविदास यांची जयंती साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. संदीप पाटील होते. यावेळी मान्यवरांनी गुरु रविदास यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन केले. याप्रसंगी डॉ. आर. डी. चौधरी, डॉ. बी. डी. रोमाडे, वरिष्ठ पर्यवेक्षक डॉ. जे. एस. सूर्यवंशी, सहा. कुलसचिव श्री. प्रशांत नागे, सहा. नियंत्रक श्री. विजय पाटील, डॉ. कुशल ढाके व डॉ. सागर पाटील उपस्थित होते. यावेळी आपल्या अध्यक्षीय भाषणात डॉ. संदीप पाटील यांनी गुरु रविदास यांच्या जीवन कार्यास उजाळा दिला. गुरु रविदास यांनी भारतभर फिरून त्यांनी महान कार्य केल्यामुळे ते जाणले जातात. ते सुधारक संतांमध्ये अग्रणी होते. ते एक कवी होते तसेच तत्कालीन प्रचलित सामाजिक विद्वान होते. त्यांनी लक्षणीय योगदान दिले. त्यांच्या गुरुग्रंथ साहेबमध्ये असलेल्या रचना आजही लोकप्रिय आहेत असेही डॉ. पाटील म्हणाले. याप्रसंगी महाविद्यालयाचे सर्व शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी विद्यार्थिनी उपस्थित होते.

## कृषि महाविद्यालय, मुक्ताईनगर येथे छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती उत्साहात साजरी





**दि. १९ फेब्रुवारी, २०२५.** कृषि महाविद्यालय, मुक्ताईनगर येथे छत्रपती शिवाजी महाराजांची ३९५ वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. संदीप पाटील होते. याप्रसंगी व्यासपीठावर विद्यार्थी परिषदेचे उपाध्यक्ष डॉ. दत्तात्रय पाचरणे, कुलमंत्री डॉ. रमेश चौधरी व सुरक्षा अधिकारी डॉ. बाळासाहेब रोमाडे हे उपस्थित होते. यावेळी सर्वप्रथम जय भवानी जय शिवाजी असा जयघोष करत कृषि महाविद्यालयाच्या प्रक्षेत्रावर शिवज्योतीची वाजत गाजत मिरवणूक काढण्यात आली. मिरवणुकीदरम्यान विद्यार्थ्यांनी शिवाजी महाराज तसेच आई जिजाऊ यांची वेशभूषा परिधान केली होती. कार्यक्रमाच्या सुरुवातीला छत्रपती शिवाजी महाराज यांच्या मूर्तीची डॉ. संदीप पाटील व उपस्थित मान्यवरांच्या हस्ते पूजा करून आरती करण्यात आली.

यावेळी आपल्या अध्यक्षीय भाषणात डॉ. संदीप पाटील यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवन कार्यास उजाळा दिला. आपल्या कारकीर्दीत शिवाजी महाराजांनी मुघल साम्राज्य, कुतुबशाही, विजापूरची आदिलशाही आणि युरोपियन वसाहतवादी शक्तींशी युती व शत्रुत्व दोन्ही केले. शिस्तबद्ध लष्कर व सुसंघटित प्रशासकीय यंत्रणेच्या बळावर छत्रपती शिवाजी महाराजांनी एक सामर्थ्यशाली आणि प्रागतिक राज्य उभे केले. किनारी आणि अंतर्गत प्रदेशातील किल्ल्यांची डागडुजी करण्यासोबतच त्यांनी अनेक नवे किल्लेही उभारले. शिवरायांनी शिस्तबद्ध प्रशासकीय संघटनांसह सक्षम आणि प्रगतीशील नागरी शासन स्थापन केले असेही डॉ. पाटील म्हणाले. याप्रसंगी महाविद्यालयाचे डॉ. दत्तात्रय पाचरणे, डॉ. बाळासाहेब रोमाडे, डॉ. सागर पाटील आणि विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त करतांना छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनाचे विविध दाखले दिले. तसेच प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांनी केलेल्या अफजलखानाचा वधाचा देखावा सादर केला. कार्यक्रमात सर्वांनी शिव शपथ घेतली आणि कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने झाली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. तुषार भोसले यांनी तर आभार डॉ. सागर बंड यांनी केले. याप्रसंगी महाविद्यालयाचे डॉ. कुशल ढाके, डॉ. मनीषा पालवे, सर्व शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी विद्यार्थिनींनी उपस्थित होते.



## कृषि महाविद्यालय, मुक्ताईनगर येथे बाळशास्त्री गंगाधरशास्त्री जांभेकर यांची जयंती साजरी



**दि. २० फेब्रुवारी, २०२५.** कृषि महाविद्यालय, मुक्ताईनगर येथे महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. संदीप पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली बाळशास्त्री गंगाधरशास्त्री जांभेकर यांची जयंती साजरी करण्यात आली. याप्रसंगी उपस्थित मान्यवरांनी बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन केले. महाविद्यालयाचे डॉ. बाळासाहेब रोमाडे यांनी बाळशास्त्री जांभेकर यांच्या जीवन कार्यास उजाळा दिला. बाळशास्त्रींना मराठी, संस्कृत, बंगाली, गुजराती, कानडी, तेलुगू, फारसी, फ्रेंच, लॅटिन व ग्रीक या दहा भाषांचे ज्ञान होते. फ्रेंच भाषेतील नैपुण्याबद्दल फ्रान्सच्या राजाकडून त्यांचा सन्मान झाला होता. तसेच जांभेकरांनी प्राचीन लिप्यांचा अभ्यास करून कोकणातील शिलालेख व ताम्रपट यांच्यावर शोधनिबंध लिहिले असेही डॉ. रोमाडे म्हणाले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. कुशल ढाके यांनी तर आभार डॉ. सागर बंड यांनी मानले. याप्रसंगी महाविद्यालयाचे सहा. नियंत्रक श्री. विजय पाटील, डॉ. मनीषा पालवे, डॉ. सागर पाटील, श्री. जयदीप बोरसे, सर्व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

## कृषि महाविद्यालय, मुक्ताईनगर येथे राष्ट्रीय विज्ञान दिन साजरा



**दि. २८ फेब्रुवारी, २०२५.** कृषि महाविद्यालय, मुक्ताईनगर येथे महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. संदीप पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली चंद्रशेखर वेंकटरामन यांच्या सन्मानार्थ राष्ट्रीय विज्ञान दिवस साजरा करण्यात आला. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्रा. नामदेव धुर्वे यांनी सर चंद्रशेखर वेंकटरामन यांच्या जीवन कार्यास उजाळा देतांना म्हणाले की सर चंद्रशेखर वेंकटरामन हे भारतीय भौतिकशास्त्रज्ञ होते. त्यांना १९३० मध्ये प्रकाश विखुरण्यासाठी भौतिकशास्त्रातील नोबेल पारितोषिक मिळाले. त्यांनी २८ फेब्रुवारी रोजी रमण इफेक्ट (रमण परिमाण) चा शोध लावला म्हणून २८ फेब्रुवारी हा दिवस राष्ट्रीय विज्ञान दिन साजरा करण्यात येतो. यावेळी उपस्थित मान्यवरांनी सर चंद्रशेखर वेंकटरामन यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. कुशल ढाके यांनी तर आभार डॉ. सागर बंड यांनी मानले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजनाच्या स्वयंसेवकांनी तसेच राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी श्री. नामदेव

धुर्वे आणि सहाय्यक कार्यक्रम अधिकारी डॉ. कुशल ढाके यांनी परिश्रम घेतले. याप्रसंगी महाविद्यालयाचे डॉ. तुषार भोसले, डॉ. सागर पाटील, सर्व शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी विद्यार्थिनींनी उपस्थित होते.

## मार्च महिन्यातील कामांचा तपशील

### ऊस

- सुरू ऊसासाठी मार्चच्या पहिल्या आठवड्यात संजीवकांच्या पहिल्या फवारणीसाठी हेक्टरी १५० लिटर पाणी लागेल. त्याकरिता जी.ए. ३ जिब्रेलिक ॲसीड (४० पीपीएम) ६ ग्रॅम, ६ बी.ए. : ६ बेन्झिल ॲडेनाईन (४० पीपीएम) ६ ग्रॅम, १५०० ग्रॅम १९:१९:१९, ३७५ ग्रॅम चिलेटेड सुक्ष्म अन्नद्रव्य व ७५० ग्रॅम सिलिकॉन (सिलिसायलिक ॲसिड) एकत्रित करून उसाच्या पानावर फवारणी करावी.
- १६ आठवडे पूर्वहंगामी वयाच्या लागणीस हेक्टरी एकूण शिफारशीत खतमात्रेच्या १० टक्के नत्र (३४ किलो नत्र) म्हणजेच ७४ किलो निमकोटेड युरीया खताचा तिसरा हप्ता द्यावा.
- पक्क्या भरणीयोग्य वाढलेल्या २० आठवडे वयाच्या ऊसात आंतरपीके घेतली असल्यास त्यांची परिस्थीती पाहून काढणी करा अथवा सरीतच दाबून भरणीची तयारी करा. यावेळी नांगरीच्या सहाय्याने सरीचे वरंबे फोडून बाकी राहीलेली रासायनिक खतांची मात्रा ४० टक्के (१३६ किलो नत्र) म्हणजेच २९५ किलो युरीया (६.५६ पोती), ५० टक्के स्फुरद व पालाश (प्रत्येकी ८५ किलो) म्हणजेच ५३१ किलो सिंगल सुपर फॉस्फेट (११.८ पोती) आणि १४२ किलो म्युरेट ऑफ पोटॅश (३.१६) एकत्र चांगले मिसळून हेक्टरी एकूण सऱ्यांच्या संख्येत विभागून रिजरने भरणी करावी व रानबांधणी करून लगेच पाणी द्यावे.
- आवश्यकतेनुसार जमिनीचा मगदुर आणि जमिनीतील ओलावा पाहून ८ ते १० दिवसाच्या अंतराने नियमित पाणीपुरवठा करावा.
- ठिबक सिंचनाची सोय असल्यास १० ते २० आठवडयापर्यंत ऊसाच्या वाढीच्या अवस्थेनुसार प्रति हेक्टरी ९ किलो नत्र, ५ किलो स्फुरद व ३ किलो पालाश पाण्यात विरघळणारे ही अन्नद्रव्ये सात दिवसांच्या अंतराने अकरा समान हप्त्यात विभागून ठिबक सिंचन प्रणालीमधून द्यावीत.
- सुरु ऊसाची लागण झालेल्या क्षेत्रावर उगवण विरळ झाली असल्यास त्या ठिकाणी लागणीच्या वेळी प्लॅस्टिक पिशवीत अथवा गादी वाफ्यावर वाढवलेली समवयस्क रोपे वापरून नांग्या भरून घ्याव्यात व त्वरीत हलके पाणी द्यावे.
- खोड किडीच्या नियंत्रणासाठी ऊस लागणीनंतर ४५ दिवसांनी ऊसाची बाळ बांधणी करावी. उसात मका, ज्वारी ही आंतरपिके न घेता, कोथिंबीर व पालक ही आंतरपिके घ्यावीत. खोडकीडग्रस्त ऊस देठ मुळासह उपटून अळीसह नष्ट करावा. हेक्टरी ५ फुले ट्रायकोकार्ड १० दिवसाच्या अंतराने ३ वेळा लावावा. खोड किडीच्या प्रादुर्भावामुळे ऊसाचे शेंडे वाळत असतील तर आंतरपीक नसलेल्या क्षेत्रात आवश्यकता असल्यास क्लोरॅन्ट्रॅनिलीप्रोल ०.४% दाणेदार हे औषध १८.७५ किलो अथवा फिप्रोनिल ०.३% दाणेदार हे औषध २५ ते ३० किलो प्रति हेक्टरी या प्रमाणात जमिनीतून द्यावे.
- ६ ते ८ आठवडे वयाच्या सुरु ऊसाला नत्र खताचा दुसरा हप्ता ४० टक्के नत्र (१०० किलो नत्र) म्हणजेच हेक्टरी २१७ किलो युरिया (४.८२ पोती) आणि १२ आठवडे वयाच्या सुरु ऊसाला नत्र खताचा तिसरा हप्ता १० टक्के नत्र (२५ किलो नत्र) म्हणजेच हेक्टरी ५५ किलो युरिया ६:१ या प्रमाणात निंबोळी पेंडीबरोबर मिसळून समप्रमाणात विभागून घ्यावा व दुसऱ्या दिवशी हलकेसे पाणी द्यावे. तसेच आवश्यकतेनुसार जमिनीतील ओल पाहून ८ ते १० दिवसाच्या अंतराने पाण्याच्या पाळया द्याव्यात.
- ठिबक सिंचनाची सोय असल्यास डिसेंबरमध्ये लागण केलेल्या ऊसाकरीता वाढीच्या आवस्थेनुसार प्रति हेक्टरी ९ किलो नत्र, ५ किलो स्फुरद व ३ किलो पालाश पाण्यात विरघळणारे हि अन्नद्रव्ये सात दिवसांच्या अंतराने अकरा समान हप्त्यात विभागून ठिबक सिंचन प्रणालीमधून द्यावीत. जानेवारीमध्ये लागण केलेल्या ऊसाकरीता वाढीच्या आवस्थेनुसार प्रति हेक्टरी १४ किलो नत्र, ६.५ किलो स्फुरद व ३ किलो पालाश हि अन्नद्रव्ये सात दिवसांच्या अंतराने पाच समान हप्त्यात विभागून ठिबक सिंचन प्रणालीमधून द्यावीत. फेब्रुवारीमध्ये लागण केलेल्या ऊसाकरीता वाढीच्या आवस्थेनुसार प्रति हेक्टरी ७.५ किलो नत्र, २.५ किलो स्फुरद व २.५ किलो पालाश हि अन्नद्रव्ये सात दिवसांच्या अंतराने चार समान हप्त्यात विभागून ठिबक सिंचन प्रणालीमधून द्यावीत.
- सुरू ऊसासाठी मार्चच्या तिसऱ्या आठवडयात संजीवकांच्या दुसऱ्या फवारणीसाठी हेक्टरी २२५ लिटर पाणी लागेल. त्याकरिता जी.ए. ३ जिब्रेलिक ॲसीड (४० पीपीएम) ९ ग्रॅम, ६ बी.ए. : ६ बेन्झिल ॲडेनाईन (४० पीपीएम) ९ ग्रॅम, २२५० ग्रॅम १९:१९:१९, ५६२ ग्रॅम चिलेटेड सुक्ष्म अन्नद्रव्य व ११२५ ग्रॅम सिलिकॉन (सिलिसायलिक ॲसिड) एकत्रित करून उसाच्या पानावर फवारणी करावी. ऊस तोडणीनंतर पाचट सरीत दाबून घ्यावे.

वर्ष :९, अंक क्र. : ९०, फेब्रुवारी, २०२५ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

- ऊसाचे बुडखे मोकळे करून धारदार कोयत्याने जमिनीलगत छाटून घ्यावेत व छाटलेल्या बुडख्यांवर १० ग्रॅ कार्बेन्डॅझिम १० लिटर पाण्यात मिसळून फवारावे.
- पाचट कुजविण्यासाठी पाचटावर प्रति हेक्टरी ८० किलो युरिया, १०० किलो सिंगल सुपर फॉस्फेट टाकावे व त्यानंतर १० किलो पाचट कुजविणारे जिवाणू शेणखतात मिसळून पाचटावर टाकावे.
- पहिले पाणी दिल्यानंतर ३ ते ४ दिवसांनी वापश्यावर आल्यानंतर पहारीच्या सहाय्याने हेक्टरी १५० किलो नत्र (३२५ किलो युरिया), ७० किलो स्फुरद (४३७ किलो सिंगल सुपर फॉस्फेट), ७० किलो पालाश (११७ किलो म्युरेट ऑफ पोटॅश) यांचे मिश्रण तसेच प्रति हेक्टरी झिंक सल्फेट २० किलो, फेरस सल्फेट २५ किलो याप्रमाणात शेणखतात मिसळून एकत्र करून बुडख्यापासून सरीच्या एका बाजूला ३० सें.मी. अंतरावर व १५ सें.मी. खोलीवर पहारीच्या सहाय्याने द्यावीत.
- फेब्रुवारीपुर्वी तोड्णी झालेल्या ऊसाचाच खोडवा राखावा. किड व काणीग्रस्त क्षेत्र असल्यास खोडवा ठेवू नये. तसेच कमीत कमी हेक्टरी १ लाख ऊसाची संख्या असलेल्या क्षेत्राचाच खोडवा ठेवावा.
- ठिबक सिंचनाची सोय असल्यास १० ते २० आठवडयांदरम्यान वय असलेल्या खोडव्यास प्रति हेक्टरी ९ किलो नत्र, ५ किलो स्फुरद व ३ किलो पालाश हि अन्नद्रव्ये सात दिवसांच्या अंतराने अकरा समान हप्त्यात विभागून ठिबक सिंचन प्रणालीमधून द्यावीत. ५ ते ९ आठवडयांदरम्यान वय असणाऱ्या खोडवा पिकास प्रति हेक्टरी १४ किलो नत्र, ६.५ किलो स्फुरद व ३ किलो पालाश हि अन्नद्रव्ये सात दिवसांच्या अंतराने पाच समान हप्त्यात विभागून ठिबक सिंचन प्रणालीमधून द्यावीत. तर १ ते ४ आठवडयांदरम्यान वय असणाऱ्या खोडवा पिकास प्रति हेक्टरी ७.५ किलो नत्र, २.५ किलो स्फुरद व २.५ किलो पालाश पाण्यात विरघळणारे हि अन्नद्रव्ये सात दिवसांच्या अंतराने चार समान हप्त्यात विभागून ठिबक सिंचन प्रणालीमधून द्यावीत.

### भुईमूग (उन्हाळी)

- भुईमूगाच्या उपटया वाणासाठी पेरणीनंतर ३५ व ४५ दिवसांनी दोन वेळा पिकांवर रिकामा ड्रम फिरवावा.
- उभ्या पिकांतील सुक्ष्म अन्नद्रव्यांची कमतरता भरुन काढण्यासाठी ०.५ टक्के लोह व ०.२ टक्के झिंक सल्फेट या मिश्रणाची पेरणीनंतर ३०, ५० व ७० दिवसांनी फवारणी करावी.
- पाने पोखरणाऱ्या किंवा गुंडाळणाऱ्या अळीच्या नियंत्रणासाठी क्विनॉलफॉस २५ ई.सी. २० मिली या प्रमाणात १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. पाने खाणाऱ्या अळीच्या नियंत्रणासाठी क्लोरोपायरीफॉस २०% प्रवाही १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.

### गहू

- पीक तयार होताच वेळेवर कापणी करावी. काही जातींचे दाणे शेतात झडतात. त्यामुळे बरेच नुकसान होते. म्हणून पीक पक्व होण्याच्या २ ते ३ दिवस अगोदर कापणी करावी. कापणीच्यावेळी दाण्यातील ओलाव्याचे प्रमाण १५ टक्के असावे. गव्हाची मळणी यंत्राच्या सहाय्याने करावी. मळणी करतांना दाणे फुटणार नाहीत याची काळजी घ्यावी.

### फळबाग व्यवस्थापन

- **डाळिंब** : रस शोषणाऱ्या फुलकिडे, फळ पोखरणारी अळी या किडींचे नियंत्रण करावे. मधमाशी पेट्यांचे संवर्धन करावे. तेल्या रोगाचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी हंगामी प्रतिबंधात्मक उपाययोजना कराव्यात. पाणी नियंत्रित वापरावे.
- **सिताफळ** : नत्रांची उर्वरीत मात्रा दयावी. बहार धरलेल्या बागेत मशागत पूर्ण करावी.
- **बोर** : बाग ताणावर सोडावी.
- **आवळा** : अनावश्यक फांदया काढाव्यात.
- **कागदी लिंबू व मोसंबी** : गरजेनुसार सुक्ष्म अन्नद्रव्यांची फवारणी करावी. सूक्ष्म अन्नद्रव्यांची कमतरता आढळल्यास फुले द्रवरूप सुक्ष्मग्रेड II ची १०० मिली १० लि. पाण्यातून फुले येण्यापूर्वी व सेटींग झाल्यानंतर अशा दोन वेळेस फवारणी करावी.
- **आंबा** : आवश्यकतेनुसार बागेस पाणी द्यावे.

### भाजीपाला व्यवस्थापन

- उन्हाळी वेलवर्गीय भाजीपाला पिकांस खुरपणी देऊन नत्र खताचा दुसरा हप्ता द्यावा.

- वेलवर्गीय पिकांना आधार देण्याचे काम पूर्ण करावे.
- उन्हाळी भेंडी काढणी एक दिवस आड करावी.
- गवार पिकाची काढणी सुरू करावी.
- रबी टोमॅटो पिकाची काढणी योग्य वेळी करावी. लांब अंतराच्या बाजारपेठेसाठी पाठवायचे असल्यास फळांवर लाल रंगाची छटा आल्यावर टोमॅटोची काढणी करावी.
- रबी हंगामातील कोबीवर्गीय पिकांची काढणी करावी. रबी हंगामातील लसूण पिकांवर कोळी या किडीचा प्रार्दुभाव होण्याची शक्यता असते. कोळीच्या नियंत्रणासाठी योग्य ते उपाय करावेत.
- रबी हंगामातील कांदा पीक पोसण्याचे अवस्थेत असल्यास पालाशयुक्त खताचा फवारा द्यावा.
- वेलवर्गीय भाजीपाल्यावर भुरी व करपा रोगाचा प्रार्दुभाव दिसून आल्यास नियंत्रणाचे उपाय करावेत.
- कांदा व लसूण पिकावरील करपा व फुलकिडीचे नियंत्रण करावे.
- भेंडी पिकावर येणारी पांढरीमाशी विषाणूजन्य रोगाचा प्रसार करते त्यामुळे पांढरी माशीचे वेळीच नियंत्रण करावे.
- उन्हाळी टोमॅटोचे पीक एक महिन्याचे झाल्यावर खुरपणी करून नत्र खताची मात्रा द्यावी.
- मिरची व वांगी रोपे तयार झाली असल्यास रोपांची पुर्नलागवड करावी लागवडीचे वेळेस संपूर्ण खतमात्रेच्या ५० टक्के नत्र, संपूर्ण स्फुरद व पालाश द्यावे.

### आले

- पूर्वमशागत जसे १ फूट खोल उभी व आडवी नांगरट करुन १ ते २ कुळवाच्या पाळ्या जमीन भुसभुशित करावी.
- हेक्टरी ७५ किलो स्फुरद व ७५ किलो पालाश या खतांचा संपूर्ण हप्ता द्यावा.
- शेवटच्या कुळवाच्या पाळी आगोदर हेक्टरी ३५ ते ४० टन चांगले कुजलेले शेणखत द्यावे.
- जमिनीतील बहुवार्षिक तणांचे कंद, काश्या वेचून गोळा कराव्यात, मोठे दगड–गोटे वेचून काढावेत.
- जमिनीच्या प्रकारानुसार लागवड प्रामुख्याने सपाट वाफे, सरी वरंबा पध्दत आणि रुंद वरंबा किंवा गादी वाफ्यावर करावी.
- सपाट वाफे पध्दतीत जमिनीच्या उतारानुसार २ x १ मी. किंवा २ x ३ मी. चे सपाट वाफे करुन २० x २० सें.मी. किंवा २२.५ x २२.५ सें.मी. अंतरावर लागवड करावी.
- सरी वरंबा पध्दतीत लाकडी नांगराच्या सहाय्याने ४५ सें.मी. वरती सऱ्या पाडून घ्याव्यात. वरंबाच्या दोन्ही बाजुस वरुन १/३ भाग सोडून २ इंच खोल, दोन रोपामधील अंतर २२.५ सें.मी. ठेवून लागवड करावी.
- रुंद वरंबा किंवा गादी वाफा पध्दत :– आधुनिक सिंचन पध्दती जसे तुषार सिंचन, ठिबक सिंचनाचा वापर केला जातो अशा ठिकाणी ही पध्दत वापरली जाते. १५ ते २० टक्के उत्पादन जास्त मिळते. जमिनीच्या उतारानुसार ९०– १२० सें.मी. वरती सरी पाडून घ्यावी म्हणजे मधील वरंबा ४५–६० सें.मी. रुंदीचा. दोन रुंद वरंब्यातील पाटाची रुंदी ४५–६० सें.मी. रुंद वरंब्याची उंची २० ते २५ सें.मी. ठेवून २२.५ सें.मी. x २२.५ सें.मी. वरती आले लागवड करावी.

### महाराष्ट्रातील देशी गोवंश

#### १. खिल्लार गाय

- **उपनांवे** : माणदेशी, शिकारी, थिल्लार
- **मुळस्थान** : महाराष्ट्रातील सांगली, कोल्हापूर, सातारा, पुणे, सोलापूर व या जिल्ह्यांच्या सीमेलगत असणाऱ्या कर्नाटकातील जिल्ह्यांमध्ये
- **शारिरीक वैशिष्ट्ये** : या गोवंशाचा रंग सहसा पांढरा असतो. काही प्रमाणात किंचीत मळकट रंग सुद्धा आढळतो. कातडी घट्ट चितकलेली व चमकदार असते. कातडीवरील केस चमकदार व बारीक असतात. यांची उंची जवळपास १४०–१५० सें मी पर्यंत असते. शिंगे गुलाबी, काळसर, लांब आणि पाठीमागे निमुळते असतात. कर्नाटक खिल्लार मध्ये शिंगे लहान निमुळती व मुळाशी जवळ असतात. तर माणदेशी खिल्लारमध्ये जाडजूड व मुळाशी थोडे दूर अशी शिंगे असतात. काटक शरीर व तापट स्वभाव यामुळे हे बैल अनेकदा मारके असतात. डोळे काळे व लांबट आकाराचे असतात. चेहऱ्याच्या तुलनेत कान लहान व शेवटला टोक असते. मान लांब व रुंद असते. गळ्याची पोळी म्हणजे गलकंबल मोठे नसते. वशिंड म्हणजे खांदे मध्यम असतात. माणदेशी खिल्लारचे वशिंड मध्यम असते. उत्तम आरोग्य असणाऱ्या या

वर्ष :७, अंक क्रं. : ९०, फेब्रुवारी, २०२५ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

प्रजातीचे खूर गच्च व काळे असतात. शेपूट लांबलचक सापासारखे व शेपूटगोंडा काळा व झुपकेदार असतो.

- वजन : बैल : २६०–२७१ किलो, गाय : २१०–२१९ किलो
- उंची : बैल : १७५.२५ से.मी. गाय : १२६.५७ से.मी.
- वेतातील सरासरी दुग्धोत्पादन : ४५०(२४०–५१५)लिटर

### २. गवळाऊ गाय

- **उपनांवे** : आरवी, गौळंगनी
- **मुळस्थान** : गवळाऊ गाय ही गायीची प्रजाती महाराष्ट्रातील विदर्भ भाग आणि मध्यप्रदेश या राज्यांमध्ये आढळते
- **शारिरीक वैशिष्ट्ये** : पांढरी किंवा हलकी राखाडी त्वचा. मान, कुबड आणि चौथऱ्यावर नरराखाडी, किंचित बहिर्वक्र कपाळ, बदामाच्या आकाराचे, किंचित कोनात ठेवलेले डोळे, मध्यम आकाराचे कान, लहान आणि टोकाला बोथट शिंगे
- **वेतातील सरासरी दुग्धोत्पादन** : ६०४(४७०–७२५)लिटर
- **दुधातील स्निग्धांचे प्रमाणे** : ५.५%

### ३. कोंकण कपिला गाय

- **उपनांवे** : सुवर्ण कपिला
- **मुळस्थान** : महाराष्ट्रातील कोंकणप्रांत, ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग तसेच पालघर जिल्हे
- **शारिरीक वैशिष्ट्ये** : मध्यम आकाराचे आणि निमुळते डोके असते. या गोवंशाचे डोळे काळे, कान मध्यम आकाराचे, सावध आणि टोकदार असतात. डोळ्याच्या बाजूने मध्यम आकाराची दोन काळी शिंगे असून, शिंग पाठीमागे वर जाऊन किंचित आत वाळलेली आणि टोकदार असतात. पाय काटक, मजबूत असून पर्वतीय क्षेत्रात फिरण्यासाठी अनुकूल असतात. पायाचे खुर मध्यम, गच्च आणि काळे असतात. या गोवंशाला शेपूट मध्यम लांब असून काळा शेपूट गोंडा असतो.
- वजन : बैल : २४० किलो, गाय : २२५ किलो
- उंची : बैल : १०६.५४ सेंमी, गाय : १००.७८ सेंमी
- वेतातील सरासरी दुग्धोत्पादन : ४५० लिटर

### ४. देवणी गाय

- **उपनांवे** : सुरती, डोंगरपट्टी, डोंगरी, वन्नेरा, वाघ्याड, बालंक्या, शेवेरा
- **मुळस्थान** : लातूर जिल्ह्यातील देवणी तालुका, उस्मानाबाद, परभणी सह कर्नाटकातील बिदर
- **शारिरीक वैशिष्ट्ये** : व्यापक आणि रुंद कान, गुळगुळीत आणि मऊ त्वचा. या देवणी जातीच्या गायी अतिशय संवेदनशील असतात.
- **वेतातील सरासरी दुग्धोत्पादन** : ८६८(६३८–१२२९)लिटर

### ५. डांगी गाय

- **मुळस्थान** : महाराष्ट्रातील नाशिक व अहिल्यानगर जिल्हे
- **शारिरीक वैशिष्ट्ये :** या गोवंशामध्ये संपूर्ण पांढऱ्या रंगावर काळे लहान आकाराचे गोल ठिपके असतात. मस्तक रुंद असून शिंगे लहान, गोलाकार असतात तर डोळे काळे, पाणीदार असतात. जास्त पावसाच्या प्रदेशात यांची कार्यक्षमता टिकून राहते. यांच्या कातडीवर तेलकट स्त्राव पसरलेला असल्याने पाण्यापासून अपाय होत नाही.काटक आणि ताकदवान असल्यामुळे या जातीच्या गायी डोंगरात जाऊन चरतात
- **वेतातील सरासरी दुग्धोत्पादन** : ४३०(१७५–८००)लिटर

### ६. लाल कंधारी गाय

- **उपनांवे** : कंदाडी
- **मुळस्थान** : नांदेड जिल्ह्यातील कंधार तालुका
- **शारिरीक वैशिष्टये** : ही जनावरे मध्यम आकाराची, धडधाकट व दिसण्यास देखणी अशी असतात. प्रमाणबद्ध शरीर आणि त्याच प्रमाणात पायांची रचना असते. अत्यंत चपळ असणाऱ्या या प्रजातीचा रंग लाल ते तपकिरी असून, विशेषतः गायी या फिकट तांबड्या/तपकिरी रंगाच्या व वळू / बैल हे तांबडे/तपकिरी रंगाचे आढळून येतात. मजबूत, डौलदार व काळसर खांदा हे वळूंचे वैशिष्ट्य आहे. शेपटीचा गोंडा काळा असतो. तसेच खूर व नाकपुडी देखील काळी असते. सड/ निरण देखील काळे असून, कान दोन्ही बाजूला समान अंतरावर लोंबकळणारे असतात. मोठे कपाळ व थोडे पुढे आलेले, डोळे काळे पाणीदार व भोवती काळे वर्तुळ असणारे, शिंगे तळात जाड व टोकाला निमुळती असतात. मान आखूड व सरळ असते. मानेखालील पोळी मध्यम आकाराची व घड्या असणारी असते. पाठ मध्यम लांबीची व रुंद असते. कास लहान व शरीराबाहेर असते.
- **वेतातील सरासरी दुग्धोत्पादन** : ५९८ लिटर

### ७. कठाणी गाय

- **मुळस्थान** : विदर्भातील चंद्रपूर, गडचिरोली आणि गोंदिया जिल्हा
- **शारिरीक वैशिष्टये** : हे दुय्यम हेतू, संकुचित शरीर, आडवे आणि सरळ कपाळ असलेले मध्यम आकाराचे गुरे आहे. कठाणी गुरे प्रामुख्याने पांढरी, लालसर आणि काळ्या रंगाची असतात. शिंगे सरळ व वाकडी, पोल नॉन–प्रॉमिनंट आणि आकाराने लहान ते मध्यम आकाराची असतात. कठाणी गुरे कमी इनपुट उत्पादन प्रणालीमध्ये चांगल्याप्रकारे जुळवून घेतात आणि खूराचा त्रास न होता साचलेल्या पाण्यात आणि पावसात भातशेतीसाठी पाणथळ जमिनीला अनुकूल अशी मसुदा क्षमता चांगली असते.
- **वेतातील सरासरी दुग्धोत्पादन** : १९३ लिटर


प्रकाशक : **डॉ. गोरक्ष ससाणे**
संचालक, विस्तार शिक्षण

प्रमुख संपादक : **डॉ. सचिन सदाफळ**
प्रभारी अधिकारी, प्रसारण केंद्र

सहसंपादक : **श्री. सुनिल राजमाने**
कनिष्ठ संशोधन सहाय्यक, प्रसारण केंद्र

डिझाईनर : **श्री. प्रदिप कोळपकर**
कलाकार तथा छायाचित्रकार, प्रसारण केंद्र
**श्री. सिध्दार्थ साळवे**
लिपीक–नि–टंकलेखक, प्रसारण केंद्र

**मफुकृवि विस्तार प्रकाशन क्र.२७८१/२०२५**